cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–८२ मंगळवार दि.२ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

सामाजिक समतोल राखणे अगत्याचे

आरक्षणाबाबत घटनेमध्ये विशिष्ट तरतूद असताना कोणीही राजकीय घटना सभागृहात असलेल्या संख्याबळाच्या पाठबळावर आरक्षणाबाबत मनमानी निर्णय घेऊ शकत नसल्याचे स्पष्ट संकेत व निर्देश पाटणा उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी दिलेल्या निकालातून दिले आहेत. या निकालाचे दूरगामी परिणाम विविध राज्यांतील आरक्षण प्रक्रियेवर होणार आहेत. विशेषत: अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रावर आजच्या घडीला अधिक दूरगामी परिणाम उमटणार आहेत.

नीट परीक्षा पुर्नमुल्यांकनासाठी सुप्रीम कोर्टात याचिका

नवी दिल्ली : नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे सर्व परीक्षा रद्द करण्याऐवजी उत्तरपत्रिकांचे पुर्नमुल्यांकन करण्याच्या मागणीसाठी ५ विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. परीक्षा रद्द केल्यास विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होईल, असे याचिकेत म्हटले आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४, १९ आणि २१ अंतर्गत परीक्षा रद्द करण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन ठरणार असल्याचे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे. प्रामाणिक विद्यार्थ्यांवर हा अन्याय असल्याने परीक्षा रद्द करण्याऐवजी उत्तरपत्रिकांचे पुर्नमुल्यांकन करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

अधिकचे पैसे घेणाऱ्या सीएससी केंद्रांवर कारवाई होणार

पीकविमा अर्जासाठी एकच रुपया द्या; जास्त पैसे मागितल्यास तक्रार करण्याचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

पीकविमा योजना सध्या चांगलीच गाजत आहे. शासनाने शेतकऱ्यांना १ रुपयात पीकविमा दिला असताना अर्जासाठी शेतकऱ्यांकडून जास्त पैसे घेण्याच्या तक्रारी येत आहेत. हा विषय सध्या माध्यमांमध्येही चांगलाच गाजत आहे. त्यामुळे कृषी आयुक्तालयाने कारवाईची तंबी दिली आहे. तसेच शेतकऱ्यांनीही १ रुपयांपेक्षा जास्त देऊ नये, जास्त पैशांची मागणी होत असेल तर कृषी विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन केले आहे.

राज्यभरात सध्या पीकविमा योनजेत शेतकऱ्यांची लूट होत असल्याच्या तक्रारी आहेत. शासन वारंवार शेतकऱ्यांकडून विमा अर्जासाठी केवळ १ रुपयाच घ्यावा, असे सांगत आहे. मात्र सीएससी केंद्रचालक अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून १०० ते २०० रुपये घेत असल्याचे शेतकरी सांगतात. माध्यमांनीही हा मुद्दा चांगलाच उचलून धरला. त्यामुळे कृषी आयुक्तालयाने हा मुद्दा गांभीर्याने घेत सीएससी केंद्रांना कारवाईचा इशारा देत शेतकऱ्यांना असे प्रकार आढळत असल्यास तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. कृषी आयुक्तालयाने म्हटले आही की, राज्यात काही ठिकाणी काही सीएससी केंद्र चालक हे शेतकऱ्याकडून प्रति अर्ज एक रूपया पेक्षा अधिक रक्कम घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. अशा प्रकारची घटना घडत असल्यास शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा सीएससी प्रमुख यांच्याकडे तक्रारी केल्यास त्याची दखल घेऊन कडक कारवाई केली जाईल.

आतापर्यंत ४० लाख नोंदी

सरकारने पीक विमा योजनेचा विस्तार वाढावा यासाठी मागील वर्षापासून महत्वाचा निर्णय घेतला. पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना एक रुपया विमा हप्ता भरून सहभागी करून घेण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने २०२३ मध्ये घेतला. गेल्या वर्षी खरीप २०२३ मध्ये राज्यातील विक्रमी १ कोटी ७० लाख विमा अर्जाद्वारे शेतकऱ्यांनी याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. चालू खरीपात म्हणजेच २०२४ मध्ये ३० जून पर्यंत ४० लाख विमा अर्ज नोंद झाली आहे.

पंकजा मुंडे यांना अखेर विधान परिषदेची संधी

भाजपकडून ५ उमेदवार जाहीर, महादेव जानकरांना डावलले

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी (दि.१ जुलै) ५ उमेदवारांची यादी जाहीर केली. यात अखेर पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेसाठी संधी दिली आहे. तसेच भाजपच्या उमेदवारांच्या यादीत सदाभाऊ खोत यांच्याही नावाचा समावेश आहे. योगेश टिळेकर, डॉ. परिणय फुके, अमित गोरखे यांचीही भाजपने विधान परिषदेसाठी उमेवारी जाहीर केली आहे.

राज्यात होत असलेल्या विधान परिषद निवडणुकांसाठी भाजपने आपले ५ उमेदवार जाहीर केले. यामध्ये राज्यातील माजी मंत्री पंकजा मुंडे, डॉ. परिणय फुके, माजी आमदार योगेश टिळेकर, अमित गोरखे यांना तर मित्र पक्षांचे सदाभाऊ खोत असे एकूण ५ उमेदवार जाहीर केले. राज्यात १२ जुलै रोजी विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी भाजपने आपले ५ उमेदवार जाहीर केले. भाजपच्या ◀◀ पान २ वर

पंकजा मुंडेंना विधानपरिषद उमेदवारी मिळताच फटाके आणि जल्लोष

पंकजा मुंडे यांची विधान परिषदेसाठी उमेदवारी घोषित होताच परळीतील त्यांच्या यश:श्री या निवासस्थानासमोर कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत जल्लोष केला. परळीसह बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी पंकजा मुंडे समर्थकांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. परळीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्टेशन रोड, राणी लक्ष्मीबाई टॉवर या मुख्य चौकातही कार्यकर्त्यांनी पंकजा मुंडे यांच्या विजयाच्या घोषणा देत फटाक्यांची आतिषबाजी करत एकमेकांना पेढे भरून व पेढे वाटून मोठा आनंदोत्सव साजरा केला आहे. दरम्यान, राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे संपर्क कार्यालय असलेल्या जगमित्र कार्यालयासमोर न.प. गटनेते वाल्मीक कराड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जमा होत फटाक्यांची आतिषबाजी करत, एकमेकांना पेढे भरवून या उमेदवारीचा आनंदोत्सव साजरा केला.

मंत्रीपद मिळणार?

पंकजा मुंडे यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली आहे. त्यामुळे आता त्यांना मंत्रिपद मिळणार का? यावर चर्चा सुरु झाली आहे. आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेता पंकजा मुंडे सारखा ओबीसी चेहरा राज्यात भाजपसाठी लाभदायक ठरणार आहे. त्यामुळे आता होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात पंकजा मुंडे यांना मंत्रिपदाची संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबई पदवीधरमध्ये ठाकरे गटाचा डंका

अनिल परब यांचा विजय, कोकणातून भाजपचे डावखरे विजयी

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब यांचा २६ हजार २६ मतांनी विजय झाला. मुंबई पदवीधरमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे अनिल परब आणि भाजपचे किरण शेलार यांच्यात लढत होती. मतदारांनी भाजपला नाकारले असून उद्धव ठाकरेंवर पुन्हा विश्वास व्यक्त केल्याची प्रतिक्रिया वरून सरदेसाई यांनी दिली. विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण पदवीधर, मुंबई शिक्षक आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांसाठी २६ जून रोजी मतदान पार पडले होते.

अनिल परबांच्या विजयामुळे शिवसेना ठाकरे गटाला मुंबई पदवीधरचा बालेकिल्ला कायम राखण्यात यश मिळाले आहे. तर दुसरीकडे कोकण पदवीधरमध्ये भाजपचे निरंजन डावखरे यांचा विजय झाला आहे. त्यांच्या विरोधात ◀◀ पान २ वर

मेधा पाटकर यांना ५ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा

नवी दिल्ली । वृत्तसेवा

सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना मानहानी प्रकरणी दिल्लीतील साकेत न्यायालयाने सोमवारी (दि. १) पाच महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांना १० लाख रुपये नुकसान भरपाईचे आदेशही दिले. दरम्यान, निकाल सुनावताना न्यायालयाने स्पष्ट केले की, मेधा पाटकर यांचे वय आणि प्रकृती लक्षा घेता त्यांच्या जामीन याचिकेवर सुनावणी होईपर्यंत ३० दिवस तुरुंगवासाची शिक्षा स्थगित राहणार आहे.

दिल्लीचे विद्यमान नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी २००१ ◀◀ पान २ वर

पत्रकारितेचे भीष्म पितामह अनंतात विलीन

हजारोंच्या उपस्थितीत नामदेवराव क्षीरसागर यांच्यावर अंत्यसंस्कार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गेली सहा दशके अखंडपणे पत्रकारिता करणारे दैनिक चंपावतीपत्रचे ज्येष्ठ संपादक नामदेवराव दादा क्षीरसागर यांचे सोमवारी सकाळी ९वा. हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी पाच वाजता मोंढा स्मशानभूमी मध्ये हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे सुपुत्र संतोष शिरसागर व सुनील शिरसागर यांनी त्यांना अग्नीडाग दिला. यावेळी अनेक नेत्यांनी आपली श्रद्धांजली वाहिली.

गेली सहा दशके अव्याहतपणे पत्रकारिता करणारे दैनिक चंपावती पत्रचे संपादक नामदेवराव दादा क्षीरसागर यांनी पत्रकारितेबरोबरच सामाजिक वारसा आणि वसा जपला. त्यांनी बीडच्या रेल्वेसाठी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी ज्येष्ठांना घेऊन एक कृती समिती स्थापन केली. नगर–परळी महामार्ग लवकर व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले. याबरोबरच सोलापूर–जालना हा मार्ग जोडावा यासाठी त्यांनी सातत्याने मागणी केली. हे काम करत असताना वाचनालय, शाळा बीड शहरात उभारण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले बीड शहरातील सहयोग नगर भागात त्यांच्या निवासस्थानी त्यांना सोमवारी सकाळी ८ वाजता हृदयविकाराचा तीव्र झटका आला त्यांना तातडीने रुग्णालयात ◀◀ पान २ वर

शेतात काम करताना विजेच्या खांब्याला धक्का लागून शेतकऱ्यासह दोन बैल ठार

दिंद्रुड । प्रतिनिधी

शेतात कोळपणी करत असताना विजेचा तीव्र धक्का बसल्याने शेतकरी व दोन बैल ठार झाल्याची घटना १ जुलै सोमवार रोजी दुपारी बारा वाजे दरम्यान माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड शिवारात गट क्र. ७०८ मध्ये घडली.

बालासाहेब बाबासाहेब डापकर (४०) रा.संगम ता. धारूर असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. सोमवारी बालासाहेब डापकर हे शेतात कोळपणी करत होते. यावेळी शेतातील विजेच्या खांबाला तान दिलेल्या तारेला लोखंडी कोळपे असलेल्या दांड्याचा स्पर्श झाल्याने त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला. या घटनेत त्यावेळी जवळच असलेले सालगडी कृष्णा बबन सोनवणे व पुतण्या रवी मनोहर डापकर दहा फुटापर्यंत फेकले गेले तर बालासाहेब डापकर व दोन्ही बैलांना विजेचा तीव्र धक्का बसल्याने ते जाग्यावरच मयत झाले. माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पावसाचे दिवस असल्याने शेतात काम करताना शेतकऱ्यांनी विजेपासून काळजी घेण्याची गरज आहे.

राहुल गांधींच्या हिंदू विधानावर लोकसभेत गदारोळ

नवी दिल्ली । वृत्तसेवा

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी हिंदू शब्द वापरुन केलेल्या विधानावरुन लोकसभेत सोमवारी (दि.१ जुलै) प्रचंड गदारोळ झाला. खुद्द पंतप्रधान मोदींनी राहुल यांच्या विधानावर तीव्र आक्षेप घेतला. संपूर्ण हिंदू समाजाला हिंसाचाराशी जोडणे योग्य नाही, असे ठणकावले. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही राहुल गांधींना जोरदार प्रत्युत्तर दिले. या वक्तव्याबद्दल राहुल गांधींनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली.

लोकसभेत सत्ताधारी भाजपवर निशाणा साधताना राहुल गांधी म्हणाले की, ''जे स्वत:ला हिंदू म्हणवतात त्यांना चोवीस तास हिंसाचार, हिंसाचार, हिंसाचार हवा असतो; द्वेष आणि खोटे,बोलत राहा. ते मुळीच हिंदू नाहीत. सत्याच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, असे हिंदू धर्मात स्पष्ट लिहिले आहे. सत्यापासून मागे हटता कामा नये. अहिंसेचा प्रसार झाला पाहिजे.'' राहुल गांधींनी हिंदू धर्म असा शब्द वापरुन केलेल्या विधानावर पंतप्रधान नरेंद मोदी उठून राहुल गांधींना रोखले. हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. संपूर्ण हिंदू समाजाला हिंसक म्हणणे ही गंभीर बाब आहे, असेही त्यांनी सांगितले. त्यावर राहुल म्हणाले की, मी भाजपला हिंसक म्हटले, नरेंद्र मोदी म्हणजे हा संपूर्ण हिंदू समाज नाही. भाजप हा संपूर्ण हिंदू समाज नाही. आरएसएस हा संपूर्ण हिंदू समाज नाही, असा दावाही त्यांनी केला. यावर पंतप्रधान मोदी म्हणाले, '' भारतीय संविधानाने मला शिकवले आहे की, मी विरोधी पक्ष नेत्याला गांभीर्याने घेतले पाहिजे.''दरम्यान, राहुल गांधींच्या वक्तव्याचा पलटवार करत ◀◀ पान २ वर

चालू अधिवेशनातच पेपर फुटीबाबत कायदा आणणार

मुंबई । प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने पेपर फुटीसंदर्भात केंद्र सरकारने कायदा केला आहे. राज्यातही अशा प्रकारचा कायदा आणण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. पेपरफुटी व गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी राज्यात कायदा आणणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य बाळासाहेब थोरात यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य राजेश टोपे, आशिष शेलार, भास्कर जाधव, अनिल देशमुख, प्रकाश आबिटकर, रोहित पवार यांनीही उपप्रश्न उपस्थित केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दोन वर्षात एक लाख पदे भरण्याची ऐतिहासिक कामगिरी या शासनाने ◀◀ पान २ वर

देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, गट 'क' वर्गाच्या जागा टप्प्या टप्प्याने एमपीएससीकडे वर्ग करणार

शिक्षकांना जुन्या निवृत्ती वेतनाचा पुढील तीन महिन्यांत निर्णय-अजित पवार यांचे आश्वासन

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील निमशासकीय आणि अनुदानित संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी निघालेल्या जाहिरातीनुसार त्यानंतरच्या कालावधीत सेवेत रुजू झाले असल्यास त्यांनाही जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय पुढील तीन महिन्यांच्या आत घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सोमवारी निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय मिळण्याबाबतच्या तारांकित प्रश्नाला उत्तर दिले. यासंदर्भात सदस्य संजय केळकर, बाळासाहेब थोरात, आशिष शेलार यांनी प्रश्न विचारले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की,१ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिराती निघालेल्या व त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय शासनाद्वारे नुकताच घेण्यात आला आहे. या निर्णयामध्ये केवळ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक पर्याय निवडण्याचा विकल्प देण्यात आला आहे. निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यांच्याबाबतीत हा निर्णय लागू करण्यात आला नसल्याची माहितीही दिली. न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात अधिक स्पष्टीकरण देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, शासन मान्यता व अनुदान प्राप्त ज्या शैक्षणिक संस्थांना १०० टक्के अनुदान दिले जाते. त्यास अनुदानित संस्था असे संबोधले जाते, असा निकाल मुंबई ◀◀ पान २ वर

शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी चर्चा

याबाबत शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या संघटनांशी चर्चा केली आहे. जुन्या निवृत्ती वेतनासंदर्भातील राज्य शासनाच्या भूमिकेबाबत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात निवेदन करण्यात आले आहे. जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यासंदर्भात काही राज्यांनी घेतलेल्या निर्णयासंदर्भातील माहिती देखील मागविण्यात आली आहे. सध्याचे सरकार अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या बाजूचे सरकार आहे, त्यामुळे त्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. त्यासंदर्भात योग्य पद्धतीचा न्याय दिला जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू : ०.५० क्विंटल			
किमान	कमाल	सरासरी	
२,३४१	२,३४१	२,३४१	
ज्वारी/हायब्रिड : ४.०० क्विंटल			
२,१५०	२,४४१	२,३२२	
मूग : १.०० क्विंटल			
७,२७६	७,५०१	७,३८८	
तूर : ४.५० क्विंटल			
११,४४०	११,४४०	११,४४०	
उडीद : ९.५० क्विंटल			
२,३३२	२,६००	२,४४४	
बाजरी: ७.०० क्विंटल			
२,३७२	२,७००	२,५७१	
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
१,७००	६,३००	४,०००	
सोयाबीन: ८.५० क्विंटल			
४,४६०	४,४६०	४,४६०	
हरभरा: १.५० क्विंटल			
४,७००	६,३००	५,५००	

cmyk

अग्रलेख

सामाजिक समतोल राखणे अगत्याचे

आरक्षणाबाबत घटनेमध्ये विशिष्ट तरतूद असताना कोणीही राजकीय घटना सभागृहात असलेल्या संख्याबळाच्या पाठबळावर आरक्षणाबाबत मनमानी निर्णय घेऊ शकत नसल्याचे स्पष्ट संकेत व निर्देश पाटणा उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी दिलेल्या निकालातून दिले आहेत. या निकालाचे दूरगामी परिणाम विविध राज्यांतील आरक्षण प्रक्रियेवर होणार आहेत. विशेषत: अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रावर आजच्या घडीला अधिक दूरगामी परिणाम उमटणार आहेत.

देशातील काही राज्यांमध्ये सध्या आरक्षण प्रकरणाने राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. अन्य राज्यांमध्ये हा विषय फारसा ज्वलंत नसला तरी महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक वातावरण तसेच स्वास्थ्य आरक्षण या विषयाने ढवळून निघाले आहे. या आरक्षणावरूनच सध्या मराठा व ओबीसी यांच्यात कलगीतुरा सुरू आहे. आरोप-प्रत्यारोप, मोर्चे, आंदोलने, उपोषणे, निदर्शने आदी लोकशाहीतील सर्व आयुधे वापरण्याचा प्रकार आरक्षणाच्या पुरस्कर्त्यांकडून सुरू आहे. मराठा समाजाला आजवर आरक्षण न मिळाल्याने महागड्या शिक्षणाचा त्यांना स्वीकार करावा लागत असल्याचे सांगत मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. मराठा समाजाला आरक्षण ओबीसी समाजातून देण्यात यावे असा मराठा आरक्षणासाठी लढा उभारणाऱ्यांचा आग्रह आहे, तर मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे, त्यांना ओबीसीच्या वाट्यात सामावून घेऊ नये यासाठी ओबीसी समाजाचे नेते देखील आक्रमक झाले आहेत. त्यांनीही उपोषणाचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे आरक्षणाच्या नावाखाली राजकीय घटक आपली निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत असले तरी मराठा व ओबीसी या जातीव्यवस्थेमध्ये काही प्रमाणात तेढ निर्माण होण्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे. समाज स्वास्थ्यासाठी ही घातक बाब आहे.

मराठा आरक्षणाच्या नावाखाली मराठा मतदार आपल्यापासून दुरावत चालल्याचे निदर्शनास आल्यावर प्रस्थापित राज्यकर्तेही मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी झुकते माप देण्यासाठी प्रयत्न करू लागले होते. त्याला अलीकडेच संपन्न झालेल्या लोकसभा निवडणुकीतील यशापयशाची झालरही तितकीच कारणीभूत होती. लोकसभा निवडणुकीत भाजपाचे रावसाहेब दानवे आणि पंकजा मुंडे व अन्य काही मातब्बर मराठा समाजाच्या नाराजीमुळेच पराभूत झाले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका आता अवघ्या साडेतीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या आहेत. विधानस निवडणुकीत मराठा समाजाची नाराजी कायम राहिल्यास सत्तासंपादनासाठी आवश्यक असलेला १४५ हा जादुई आकडा गाठणे महायुतीला अवघड जाणार असल्याचे संकेत लोकसभा निवडणूक निकालात प्राप्त झाले आहेत. सध्या महाराष्ट्रात ६२ टक्के आरक्षणाची मर्यादा आधीच असताना त्यात मराठा समाजासाठी आरक्षण देण्याने आरक्षण मर्यादेत आणखीनच वाढ होणार आहे. आरक्षणाचा विषय निघाल्यावर आरक्षणाचे समर्थक अथवा आरक्षणासाठी आग्रही असणारे घटक तामिळनाडू राज्यात असलेल्या ६९ टक्के आरक्षणाकडे बोट दाखवित असतात. तामिळनाडूला एक न्याय आणि आम्हाला वेगळा न्याय का, असा टाहो देखील आरक्षणाच्या समर्थकांकडून फोडण्यात येत आहे. तामिळनाडूच्या ६९% आरक्षणाला अद्यापही सर्वोच्च न्यायालयाची मान्यता नाही. तामिळनाडूच्या या आरक्षणाला आव्हान देणारी मद्रास उच्च न्यायालयाचे वकील ॲड. के. एम. विजयन यांची याचिका गेली अनेक वर्षे सर्वोच्च न्यायालयात स्थगित आहे. या याचिकेवर वेळोवेळी सुनावण्या झाल्या आहेत. मंडल आयोगाच्या आधीच तामिळनाडूत ६० टक्के आरक्षण राबवले जात होते. नंतर मंडल कमिशनच्या शिफारसीबाबत सहानी केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने एकूण ५० टक्क्यांपेक्षा आरक्षण देता येणार नाही, असे सांगितले. तरी सुद्धा आज तामिळनाडूत ६९ टक्के आरक्षण दिले जात आहे. पाटणा उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता आरक्षणाबाबत आग्रही भूमिका मांडणाऱ्या सर्वच राज्यांतील घटकांच्या महत्त्वाकांक्षांना आता पायबंद बसेल व काही प्रमाणात आरक्षणाच्या वादळालाही लगाम घालणे शक्य होईल. आरक्षण देताना राज्यकर्त्यांचा राजकीय स्वार्थ असता कामा नये. आरक्षण देताना समाजामधील सामाजिक समतोल राखणे काळाची गरज आहे. आरक्षणामुळे समाजातील गरजू घटकांचा विकास होणे आवश्यक आहे. आर्थिक निकषावरील आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयानेही मंजुरी दिलेली आहे. प्रत्येक समाजामध्ये आर्थिक क्षेत्रात पिछाडीवर असलेल्या घटकांचा या आरक्षणातून विकास होणे सहजशक्य आहे. आरक्षणातून समाजातील अर्थकारणाचा व प्रगतीचा समतोल राखला जाणे आवश्यक असून समाजात वाद निर्माण होणे कोणालाही अपेक्षित नाही.

पानी से पंगा.. कभी नहीं.. कभी नहीं!

नेमीची म्हणावा तसा आलेला पावसाळा चांगलाच रंगत आणत आहे. यातून शेतकरीच नव्हे तर सारी सृष्टी सुखावली असल्याचं चित्र आपणास दिसत आहे तर दुसऱ्या बाजूस पावसात निघणारी उत्सवी आणि उत्साही पर्यटकांची मांदियाळी समोर वाढून ठेवलेलं संकट किती गहिरं आहे याची जाणीव करून देताना दिसत आहे.

असाच पावसाळी पर्यटनाचा धोका लोणावळ्याजवळ भुशी धरण भागात नुकताच समोर आला. एक पूर्ण कुटुंब परिसराची माहिती करून न घेता जीवघेणं धाडस करताना आणि पुराच्या लोंढ्यात वाहून जाताना साऱ्यांनी बघितले.

रोजच्या रुटीन पासून दूर जाण्याच्या प्रयत्नात असे पर्यटन होते. पर्यटन करावे जरूर परंतु त्याबाबत काळजी घेणं अतिशय महत्त्वाचा असतं ज्या ठिकाणी आपण जाणार आहोत त्या ठिकाणी असणारी स्थानिक स्थिती आणि तिथे असणाऱ्या लोकांमधील त्यांची माहिती सर्वप्रथम जाणून घ्यायला हवी आणि अशी माहिती घेऊन त्यानुसार स्वतःच्या सुरक्षेचीही काळजी आपण घ्यायला हवी.मी स्वतः बेसिक माउंन्टेनिअरिंग चे प्रमाणपत्र घेतले आहे. या प्रशिक्षणात स्थानिक व्यक्ती आणि स्थानिक परंपरा याचा आदर करण्याचे शिकविण्यात येते. सध्या ग्लोबल वार्मिंगच्या प्रभावाने पडणारा पाऊस आणि त्याचे प्रमाण व्यस्त झालेले आहे. पाऊस ज्या पद्धतीने डोंगराळ भागात पडतो तसा पाऊस आता पठारी भागात देखील होतो अचानक पडणारा मोठ्या प्रमाणातील पाऊस अर्थात ढगफुटी आणि अचानक मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने येणारे पूर यांचे प्रमाण वाढलेले आहे. नदीच्या वरील भागात मोठ्या

प्रमाणावर झालेल्या पावसाचा परिणाम उतारावरील क्षेत्रात नदीला अचानक पूर येणे, अचानक पाणी पातळी वाढणे या स्वरूपात दिसतो. हिमालयात असा प्रकार सर्वाधिक प्रमाणात होतो.

अचानक झालेली ढगफुटी आणि त्यात वितळलेल्या हिमनद्या याचा परिणाम केदारनाथ येथील दुर्घटनेत आपण बघितला. अचानक मोठ्या प्रमाणावर पाणी आल्याने नद्यांनी पात्र बदलण्याचा प्रकार त्यावेळी घडला परिणामी हजारो जणांना प्राण गमवावे लागले होते.

आपल्या राज्यात देखील सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये या स्वरूपाच्या पावसाचे आणि अचानक येणारे पुराचे प्रमाण वाढलेले आहे.नदीपात्रांना आपण उतरतो त्यावेळी नदीच्या वरील भागात पडणाऱ्या पावसाची माहिती आपणास असत नाही आणि अशी माहिती घ्यावी हे पर्यटकांनाही माहीत नसते. पाणी ही प्रचंड शक्ती आहे. त्यात पुराचे पाणी म्हणजे कहर, अगदी पट्टीचे जलतरणपटू देखील पुरात प्राण गमावलेले आपण बघितले व वाचले आहे. पुरातून वाचविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे अशा आपत्ती मदत दलाच्या लोकांना देखील यात प्राण गमवावे लागल्याच्या घटना ताज्या आहेत. अशा स्थितीत पोहण्याचे ज्ञान नाही स्वतःचे प्राण वाचवण्याची ही क्षमता नाही, अशा व्यक्ती पाण्यात उतरण्याचा धोका पत्करतात याला धाडस म्हणता येणारच नाही असा हा धोका प्रत्यक्षात मृत्यूला दिलेले निमंत्रण ठरते. असे प्रकार पावसाळ्यात अधिक होतात. नद्या आणि समुद्र किनाऱ्यावर विनाकारण आमंत्रित केलेले धाडस प्राणघातकच आहे याच भूमिकेतून सर्वांनी पावसाळी पर्यटनाबाबत सतर्क रहावे. भविष्यात अशा घटना टाळायच्या असतील तर या प्रकारची जनजागृती देखील महत्त्वाची आहे. भिजण्याचा आनंद पावसात उभा राहून देखील घेता येतो त्यासाठी धबधब्याची आवश्यकता नसते म्हणून सांगावे वाटते पानीसें पंगा... कभी नही ! वेळी सावध व्हा काळजी घ्या.

प्रशांत विजया अनंत दैठणकर
जिल्हा माहिती अधिकारी
बीड

गेवराई उपजिल्हा रुग्णालय सामाजिक बांधिलकी म्हणून भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी

भारतीय संघाचे २० विश्वचषक जिंकल्याबद्दल गेवराई शहरातील क्रिकेट खेळाडू तसेच काही सामाजिक कार्यकर्ते यांनी गेवराई उपजिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आला होता.

या रक्तदान शिबिरात चांगला प्रतिसाद मिळाला या रक्तदान शिबीराला गेवराई शहरातील माजी नगरसेवकांनी,युवा नेत्यांनी तसेच जेष्ठ पत्रकार काझी अमान तसेच बीड राज्यकर्ता संपादक अमोल वैद्य यांनी भेट दिली व आयोजकांची प्रशंसा केली. तसेच गेवराईत प्रथमच क्रिकेट सामना जिंकल्यानंतर अश्या प्रकारे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. आयोजक:- एम डी ग्रुप,रॉयल स्टार क्रिकेट क्लब हमजा क्रिकेट क्लब ११ स्टार क्रिकेट क्लब रक्तदान शिबीर उत्तम प्रकारे आयोजित केले होते.

रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आल्या नंतर लगेच त्याचा फायदा गेवराई येथील एक पेशंट ज्याला रक्ताची नितांत गरज होती त्याला झाला आहे याचे अर्थ रक्त दान जीवन दान हे खरे ठरले आहे. रक्त दात्यांना कळताच त्यांनी समाधान व्यक्त केले.

जिल्हा प्रशासन व चाईल्ड हेल्प लाईनच्या झटपट कार्यवाही मुळे थांबला बालविवाह!

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील १४ वर्षीय बालिकेचा बाल विवाह थाबंविण्यात यश आले आहे. शनिवार दि.२९.०६.२०२४ रोजी होणारा बालविवाह प्रशासन व चाईल्ड लाईन यांच्या झटपट कार्यवाहीमुळे याबाबतची कार्यवाही अविनाश पाठक जिल्हाधिकारी बीड यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. कार्यवाही तहसिलदार केज, ग्रामसेवक, पोलिस अधिकारी / कर्मचारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन बीड कार्यालयाच्या प्रसंगावधानामुळे १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा बालविवाह थांबवीण्यात आल्याने या मुलीला पुढील आयुष्य स्वेच्छेने जगण्याची दूसरी संधीच मिळाली आहे.

बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती जिल्हा चाईल्ड हेल्पलाईन बीड कक्षाला मिळाल्यानंतर ही कार्यवाही करण्यात आली.

चाईल्ड हेल्पलाईन कक्षाला १०९८ या टोल फ्री क्रमांका वरुन मुलांच्या काळजी व संरक्षणा संदर्भात विविध प्रकारची प्रकरणे मिळतात, बालविवाह, हरवलेली मुले, लैंगिक किंवा शारीरिक अत्याचाराची प्रकरणे, बेघर मुलांची प्रकरणे. या मध्ये माहिती देणाऱ्याचे नाव गुपित ठेवले जाते. केज तालुक्यातील १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह आयोजित होणार आहे अशी गुपित माहिती बीड चाईल्ड हेल्पलाइनला मिळाली, याच माहितीच्या आधारावर तातडीने नववधूच्या वयाची शहानिशा तहसिलदार, केज ग्रामसेवक, पोलिस अधिकारी / कर्मचारी , जिल्हा प्रशासन चाईल्ड लाईन च्या टीम ने केली. सदरील मुलगी अल्पवयीन असल्याचे मुलीच्या शाळेतील निर्गम उताऱ्यावरून पुढे आले. कुटुंबातील पालकांना मुलींचा विवाह वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी न करण्याबाबत समुपदेशन करण्यात आले. अल्पवयात लग्न लावून दिल्यास व त्यास सहकार्य करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊन त्यांना एक लाख रुपये दंड व दोन वर्षे कारावास होऊ शकते याबाबत माहिती देण्यात आली. संकटग्रस्त मुला मुलींच्या संदर्भात काही अडचणी असल्यास टोल फ्री क्रं १०९८ फोन करण्यात यावा असे आवाहन सुधीर ढाकणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बीड यांनी केले आहे. मंगेश जाधव, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, चाईल्ड लाईन जिल्हा समन्वयक अश्विनी जगताप, चाईल्ड लाईन सुपरवायजर प्रसाद पवार, प्रवीण वीर यांनी हे प्रकरण हाताळले.

पाटोदा न्यायालय येथे नव्याने अंमलात येणाऱ्या कायद्याच्या संदर्भात जनजागृती शिबिर संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

आज दिनांक २९/०६/२०२४ दिवाणी न्यायालय, पाटोदा येथे विधी सेवा समिती पाटोदा व वकिल संघ पाटोदा यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १ जुलै २०२४ पासुन नव्याने अंमलात येणा-या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३,भारतीय साक्ष अधिनियम २०२३,भारतीय न्याय संहिता २०२३,या नवीन कायदया बाबतची जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमास न्यायिक अधिकारी, वकील संघातील पदाधिकारी, पॅनल लॉयर्स, पीएलव्ही तसेच पोलिस कर्मचारी व न्यायालयात उपस्थित पक्षकार या कार्यक्रमास उपस्थित होते.

पान १वरून...

मेधा पाटकर यांना ५

मध्ये मेधा पाटकर यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यावेळी सक्सेना हे अहमदाबाद येथील नॅशनल कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टीजचे प्रमुख होते. एका दूरचित्रवाणीवर त्यांच्याविरोधात अपमानास्पद टिप्पणी आणि बदनामकारक विधान केल्याप्रकरणी त्यांनी मेधा पाटकर यांच्याविरोधात खटला दाखल केला होता. २००१ पासून या प्रकरणी मेधा पाटकर कायदेशीर लढाई लढत होत्या. या प्रकरणी मेधा पाटकर यांना मे महिन्यात दोषी ठरवण्यात आले होते. दिल्लीतील साकेत न्यायालयाने त्यांना पाच महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. सक्सेना यांना दहा लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे निदर्शही न्यायालयाने दिले आहेत. आपला आदेश देताना न्यायालयाने स्पष्ट केले की, मेधा पाटकर यांचे वय आणि प्रकृती लक्षात घेता त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. पाटकर यांनी कोर्टात जामीनासाठी अर्ज केला आहे. जामीन याचिकेवर सुनावणी होईपर्यंत ३० दिवस तुरुंगवासाची शिक्षा स्थगित राहिल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निकालानंतर माध्यमांशी बोलताना मेधा पाटकर म्हणाल्या की, ''सत्याचा कधीही पराभव होऊ शकत नाही. आम्ही कोणाचीही बदनामी करण्याचा प्रयत्न केलेला नाही. आम्ही फक्त आमचे काम करतो. आम्ही न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देऊ.

राहुल गांधींच्या हिंदू विधानावर

अमित शहा म्हणाले की, ''जे स्वत:ला हिंदू म्हणवतात, हिंसेची भाषा करतात, करोडो लोकांना माहित नाही स्वत:ला हिंदू म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीने या धर्माला हिंसाचाराशी जोडले आहे. मला राहुल गांधी यांना एक विनंतीही करायची आहे की, त्यांनी एकदा इस्लाममधील अभ्यासकांचे मत घ्यावे. गुरु नानक साहिब यांच्या अभयमुद्रेवर त्यांनी मत घ्यावे. जेव्हा वैचारिक दहशत होती तेव्हा त्यांनी संपूर्ण देशाला घाबरवले होते.''

चालू अधिवेशनातच पेपर फुटीबाबत

केली आहे. शासनाने ७५ हजार पदे भरतीची घोषणा केली होती. त्यापैकी ५७ हजार ४५२ जणांच्या नियुक्तीचे आदेश दिले आहेत, तर १९ हजार ८५३ जणांना नियुक्तीचे आदेश देण्याची कार्यवाही सुरू आहे. ३१ हजार २०१ पदांसाठी भरतीची कार्यवाही सुरु आहे. या पुढील काळात निरंतर भरती प्रक्रिया सुरू राहील. गट 'क' वर्गाच्या जागा टप्प्या टप्प्याने एम.पी.एस.सी.कडे वर्ग करण्यात येणार आहेत. गट 'क' वर्गाच्या रिक्त पदांची भरती यापुढे एम.पी.एस.सी मार्फत करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत राजपत्रित पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. फेर परीक्षा घेण्याबाबत व या परीक्षेशी संबंधित गैरप्रकार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत मृद व जलसंधारण विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.सदर परीक्षा टीसीएस आणि आयबीपीएसतर्फे होतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पंकजा मुंडे यांना अखेर

वतीने विधानपरिषद उमेदवारीसाठी चर्चेत असलेल्या नावांपैकी पंकजा मुंडे, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे यांना उमेदवारी मिळाली. मात्र राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांचा पत्ता यामध्ये कट झाला तर रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत यांना भाजपने विधान परिषदेची उमेदवारी दिली. आगामी विधानसभा निवडणुकीचा विचार करून महाराष्ट्र राज्यातील सामाजिक, राजकीय आणि प्रादेशिक समीकरणे साधण्याचा प्रयत्न यामध्ये भाजपने केला आहे. महादेव जानकरासंह माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार निलय नाईक, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, भाजप नेत्या माधवी नाईक यांचीही नावे विधान परिषदेसाठी चर्चेत होती. भाजपचे संख्याबळ पाहता पंकजा मुंडे यांचे निवडून येणे निश्चित आहे.

पत्रकारितेचे भीष्म पितामह

हलवण्यात आले. मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्यावर दुपारी ५ वाजता मोंढा भागातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.जिल्ह्यातील आणि जिल्हा बाहेरील पत्रकार मंडळी, जिल्ह्यातील सर्व नेते, सर्वपक्षीय कार्यकर्ते, नातेवाईक, डॉक्टर, वकील, शिक्षक सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .त्यांच्या पश्चात संतोष उर्फ बंडू क्षीरसागर, सुनील शिरसागर अशी दोन मुले, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे .यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री सुरेश नवले, माजी आ. उषाताई दराडे, माजी आ. प्रा. सुनील धांडे ,माजी आ. राजेंद्र जगताप, माजी जि.प.उपाध्यक्ष विजयसिंह पंडित, ज्येष्ठ विधिज्ञ ऍडव्होकेट कालिदास थिगळे यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकून आदरांजली वाहिली.

शिक्षकांना जुन्या निवृत्ती वेतनाचा

उच्च न्यायालयाने ३० एप्रिल २०१९ रोजी दिला आहे. सरकारच्या बाजूने दिलेल्या या निर्णयास शिक्षक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल, त्याची कार्यवाही राज्य शासनामार्फत करण्यात येईल, असे आश्वासनही यावेळी दिले.

मुंबई पदवीधरमध्ये

काँग्रेसचे रमेश किर हे उभे होते. विजयानंतर पहिली प्रतिक्रिया देताना अनिल परब म्हणाले की, हा विजय मी बाळासाहेबांच्या चरणी अर्पण करतो. बाळासाहेबांचा आशीर्वाद असाच कायम राहू दे. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला त्यासाठी मी आभारी आहे. माझ्या विजयासाठी शिवसेना आणि महाविकास आघाडीचे घटकपक्ष लढले त्यांचाही आभारी आहे. मुंबई फक्त शिवसेनेचीच असल्याचे सांगत अनिल परब म्हणाले की, शिवसेना आमच्या साहेबांची, नाही कुणाच्या बापाची हे सिद्ध झाले आहे. मुंबईमध्ये शिवसेना आणि शिवसेनाच असणार, तीही उद्धव ठाकरेंची शिवसेना असणार. मुंबईचा मतदार हा शिवसेना उद्धव ठाकरेंच्या मागे उभा आहे, असे ते म्हणाले.

पान ६ वरून...

गट शेतीची चळवळ आणखी

विषमुक्त शेती याच्याबद्दल शेतकऱ्यांना माहिती सांगत नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी कृषी विभागाकडून गटातील शेतकऱ्यांना मदत करण्याचा आश्वासन यावेळी दिले.अन्नदाता शेतकरी गट जामगाव तसेच राजमाता महिला शेतकरी गट गांधणवाडी यांनीही या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.यावेळी गटातील सदस्य रमेश पठाडे,बाबासाहेब कोल्हे,भाऊराव धोंडे,अशोक झांबरे,शहाजी झांबरे,नितीन पठाडे,अमोल पठाडे,विशाल पठाडे,अय्या शेख,वैभव पठाडे,सुदाम पठाडे यांच्यासह अनेक तसेच कृषी विभागाचे सर्व कर्मचारी व शिक्षक, विद्यार्थी, आष्टा जामगाव गांधणवाडी येथील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या

मंदिर विश्वस्त न्यासाचा व देवी भक्तांच्या होतांचेच निर्णय घेऊ, सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शी ठेवू, त्याचबरोबर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही आग्रही व प्रयत्नशील राहू'' अशी शपथ दिली.

नुकत्याच झालेल्या बैठकीत नवनियुक्त विश्वस्त राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, शिरीष पांडे, सतीश लोमटे, अशोक लोमटे, संजय भोसले, राजाभाऊ लोमटे,अमोल लोमटे, राजपाल भोसले, प्रविण दामा, अजित चव्हाण, रवी कदम, श्रीराम देशपांडे, हंसराज देशमुख, आणि श्रीमती संध्या मोहिते हे उपस्थित होते. पदसिद्ध अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे यांनी सर्व नवनिर्वाचित विश्वस्त मंडळास त्यांच्या नियुक्ती बद्दल सर्वांचे अभिनंदन करत त्यांना देवल कमिटी बाबतच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

श्री योगेश्वरी देवल कमिटीचे नवनियुक्त उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आपणावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल उपस्थित तहसीलदार तथा सर्व विश्वस्त मंडळाचे आभार व्यक्त केले. यापुढे आपण सर्वांना सोबत घेऊन मंदिर व मंदिर परिसर कशा पद्धतीने नावारूपास आणता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. श्री योगेश्वरी देवी व देवीच्या मंदिरामुळे अंबाजोगाई शहराची एक वेगळी ओळख आहे ती ओळख यापुढेही आणखी सर्वदूर पोचविण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करु अशी अपेक्षा व्यक्त केली. दररोज देवीच्या दर्शनासाठी हजारो भक्त येतात ,आलेल्या भक्तांना मंदिरात कसलीही गैरसोय होणार नाही त्यांना येथे येऊन समाधान वाटावे , मानसिक शांती मिळावी याची देखील काळजी घेणार आहोत असे ही याप्रसंगी राजकिशोर मोदी म्हणाले. यापूर्वी शासनाने तीर्थक्षेत्र विकास योजनेच्या माध्यमातून वेळोवेळी विकासनिधी दिला आहे. माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी देखील आमदार असतांना मंदिर प्रशासनास विकासनिधी पुरवला होता. त्याचबरोबर नगर परिषदेच्या माध्यमातून देखील आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कालखंडात मंदिर व मंदिर परिसरात अनेक मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे नमूद केले. यापुढेही आपण सर्वांच्या साक्षीने तसेच माता योगेश्वरी देवीच्या आशीर्वादाने मंदिर सुस्थितीत आणण्यासाठी प्रयत्नशिल राहण्याचे अभिवचन याप्रसंगी सर्व पदाधिकारी तथा विश्वस्त मंडळास दिले.

यावेळी कमिटीचे नवनियुक्त सचिव प्रा. अशोक लोमटे यांनी बोलताना मंदिराच्या प्रगतीसाठी जे जे म्हणून आवश्यक आहे ते परिपूर्ण करण्यासाठी सर्वांना सोबतीने घेऊन कार्य करण्याची हमी दिली.माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की माझ्या आमदार पदाच्या कार्यकाळात आराधी निवाससाठी जवळपास दोन कोटींचा निधी उपलब्ध करून दिला होता.यापुढेही आपण वेळोवेळी शासनस्तरावर मंदिराच्या विकासासाठी विविध योजनांचा माध्यमातून निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न शील असू असे आश्वासन याप्रसंगी दिले.सहसचिव संजय भोसले यांनी देखील यावी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. न्यासाचा विकासासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करून येणाऱ्या भाविक भक्तांना अद्यावत व दर्जेदार सेवा उपलब्ध करून देऊ तसेच मंदिर व परिसर स्वछ व सुशोभित ठेवण्यासाठी प्रत्यक्ष रित्या प्रयत्न करण्याचे अभिवचन भोसले यांनी दिले. देवल कमिटीचे कोषाध्यक्ष शिरीष पांडे यांनी देवल कमिटीचा संपूर्ण व्यवहार हा स्वच्छ व पारदर्शी ठेवून याद्वारे मंदिर परिसरात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानानुसार अद्यावत सेवा पुरऊन त्यांना अधिकाधिक सेवा देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे पांडे यांनी सांगितले. शेवटी श्रीराम देशपांडे यांनी देवल कमिटीच्या वतीने अन्नछत्र सुरू करावे, गोशाळा सुरू करण्यात यावी, ग्रामीण भागातील निराधारासाठी वृद्धाश्रम सुरू करण्याचा मानस करावा अशी मागणी केली.

वसंतराव नाईक यांचे कृषी

डॉ. हनुमान गरड यांनी मार्गदर्शन केले यावेळी उपस्थित अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात मागील वर्षी विविध पीक स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या व प्रगतशील शेतकऱ्यांच्या येथोचित सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाल श्री जे. एल.खेडकर मंडळ कृषी अधिकारी माजलगाव,श्री घनघाव कृषी विस्तार अधिकारी, श्री गडपाळे कृषी विस्तार अधिकारी प. स. माजलगाव आणी कृषी विभागातील कर्मचारी आणी शेतकरी मोठया प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक माजलगाव यांनी केले आभार प्रदर्शन श्री अतिश चाटे कृषी प्रवेक्षक यांनी मानले

पंकजाताई मुंडे यांच्या

नामावली मध्ये पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांचे क्रमांक १ वर नाव घोषित केले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये पंकजाताई मुंडे यांना अल्पशा मताने दुर्दैवी पराभव पत्करावा लागला होता. तरी त्यांनी नवीन उत्साह पूर्वक पक्ष कार्याला त्यांनी वाहून घेतले असतानाच त्यांच्या कार्याची दखल पक्षश्रेष्ठीने घेऊन त्यांना विधानपरिषदेची बुधवारी उमेदवारी जाहीर केली आहे. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे या संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर धडाडीच्या आणि लोकप्रिय नेत्या असून त्यांच्या नेतृत्वाखाली आगामी काळामध्ये भारतीय जनता पार्टी अधिक जोमाने काम करील आणि विधानसभा निवडणुकीमध्ये अत्यंत प्रभावीपणे त्यांच्या या कामाचे प्रतिबिंब उमटणार आहे असेही माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

महादेव कोळी समाज व

लाभापासून मुकावे लागत आहे.

वैधतेच्या नावा खाली कोळी महादेव . कोळी मल्हार . कोळी ढोर / टोकरे कोळी जमात बांधवांच्या कत्तली सुरु आहेत. सदरची दि२८/०६/२०२४ ची रद्द बैठक आपण तातडीने पुन्हा तात्काळ बोलवावी आशी मागणी महादेव कोळी समाज महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष गोरख (आबा) पुर्णे यांनी केली आहे.

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या

यशस्वी पूर्ण झाला या प्रकल्पात रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे सर्व सन्माननीय सभासद यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.तसेच माजलगाव शहरातील व परिसरातील नागरिकांनी बहुसंख्येने सहभाग नोंदवून सहकार्य केले.रोटरीचे नवीन वर्ष दिनांक एक जुलै रोजी सुरू होत असून या नवीन वर्षामध्ये पहिल्याच दिवशी पाच प्रोजेक्ट हाती घेऊन ते यशस्वी पूर्ण करून नूतन अध्यक्ष ऑड रवींद्र कानडे व सचिव सौ लता जोशी यांनी दमदार सुरुवात केली असून वर्षभरात विविध प्रोजेक्ट्स च्या माध्यमातून सामाजिक योगदान देणारी चळवळ उभी राहील असा विश्वास रोटरीच्या कार्यकारिणीने व्यक्त केला आहे व येत्या काळामध्ये माजलगाव शहर व परिसरातील नागरिकांसाठी विविध योजना रोटरी क्लबच्या माध्यमातून राबवण्याचा संकल्प केला आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.२ जुलै २०२४

लोकशाही दिनात एकुण ७ अर्ज प्राप्त

बीड : जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे ०७ प्रशासकीय अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला. यावेळी महसूल, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

नव महाराष्ट्र घडविण्यात वसंतराव नाईक यांचा सिंहाचा वाटा - जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या जडण-घडणीत महाराष्ट्र राज्यातील अनेक महान नेत्यांचा व महापुरूषांचा हातभार लागलेला असुन महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी अनेक मान्यवरांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये कृषी क्षेत्र रोजगार हमी योजना, पंचायत राज व्यवस्था यांची प्रभावी अंमलबजावणी करून गरीब, शेतकरी, कष्टकरी, कामगार या घटकांसाठी त्यांना हक्काच्या योजना सुरू करून राज्याला पुढे नेण्याचे आणि नव महाराष्ट्र घडविण्यात महाराष्ट्राचे सर्वाधिक मुख्यमंत्री पदी राहणारे स्व.वसंतराव नाईक यांचा सिंहाचा वाटा होता असे गौरोद्गार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

वसंतराव नाईक अधिकारी कर्मचारी संघटना बीड व तमाम बंजारा बांधव यांच्या वतीने बीड शहरातील वसंतराव नाईक पुतळ्यासमोर कृषी दिनानिमित्त व वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. सर्व प्रथम माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. बंजारा समाज संपूर्ण भारतभर पसरलेला असुन या समाजाची कष्टकरी समाज म्हणून ख्याती आहे. उसतोडणी करणारा समाज म्हणून असणारी ओळख पुसण्यासाठी समाजातील सुशिक्षीत व समजदार तरूणांनी समाज परिवर्तन करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात हा समाज राजकीय क्षेत्रात पण पुढे असुन वसंतराव नाईक, सुधाकर नाईक, मनोहर नाईक, निलय नाईक, धोंडीराम राठोड, सखाराम पवार, सवाईराम जाधव, ना.संजय राठोड असे महान व्यक्ती होवून गेले व काहीजण महाराष्ट्रात काम करत आहेत. येणार्या काळात नाईक साहेबांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरण करणे व छतासाठी आपण निधी देऊन मदत करू असे आश्वासन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिले. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगिता चव्हाण, माजी जि.प.उपाध्यक्ष गंगाधर घुमरे, जिल्हा अतिरीक्त शल्यचिकित्सक नागेश चव्हाण, माजी सभापती बाबुराव जाधव, बंजारा समाजाचे जिल्हाध्यक्ष अंकुश राठोड, विमुक्त भटक्या सेलचे भुषण पवार, आश्रमशाळेचे सचिव सुशिल पवार, वसंतराव नाईक संघटनेचे जिल्हा मार्गदर्शक बाबासाहेब चव्हाण, जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, कार्याध्यक्ष प्रा.जगन्नाथ चव्हाण, उपाध्यक्ष शिवलाल राठोड, प्राचार्य राजेशकुमार राठोड, प्रा.बंडु राठोड, मु.अ.लहु चव्हाण, कैलास राठोड, तालुकाध्यक्ष प्रकाश आडे, उपाध्यक्ष विष्णू राठोड, सचिव श्रीमंत चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, इंजि.गुलाब राठोड, सचिन पवार, सरपंच स्वरूपराव राठोड, माजी सरपंच बाबुराव राठोड यांच्यासह समाजातील डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधव यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार

नवनियुक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचा संकल्प

मुंबई : महाराष्ट्राला अत्यंत आदर्श अशा प्रशासनाची प्रदीर्घ परंपरा असून या परंपरेची पाईक होण्याची संधी मला मिळाल्याचा अत्यानंद होत आहे. समाजातील विविध घटकांसाठी असलेल्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ हा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रशासन अधिक गतिमान करण्यावर माझा भर असेल, अशी भावना नवनियुक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी व्यक्त केली.

मुख्य सचिवपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. महाराष्ट्राच्या प्रशासन व्यवस्थेबद्दल देशभर अत्यंत आदराने बोलले जाते. प्रशासनाची ही वैभवशाली परंपरा त्याच पद्धतीने समोर नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नक्कीच करेन. प्रशासन संस्कृतीतच मी वाढले आहे. माझे बरेच नातेवाईक प्रशासकीय अधिकारी राहिले आहेत. माझे आजोबा नागपूरला रेल्वेचे मोठे अधिकारी होते. माझी मावशी आशा सिंग ही प्रशासनात ज्येष्ठ अधिकारी होती. दुसरी मावशी राणी जाधव या आयएएस अधिकारी होत्या. अनेक पदे त्यांनी भूषविली. पती मनोज सौनिक तर मुख्य सचिव राहिले. थोडक्यात मला कुटुंबापासूनच प्रशासनाची ओळख होत गेली आणि पुढे त्यातच संधी मिळाली.

इतकी वर्षे प्रशासकीय कामकाज करताना आलेल्या अनुभवाचा आता मुख्य सचिव म्हणून महाराष्ट्राला फायदा करून देण्याचे मनात आहेच. महाराष्ट्राच्या प्रशासनातील सर्वच अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि माध्यमे मला निश्चितपणे सहकार्य करतील, असा आपल्याला विश्वास असल्याचे सुजाता सौनिक म्हणाल्या.

जि.प.शाळेतील मुख्याध्यापक तथा शिक्षकांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साकुड उर्दूच्या मुख्याध्यापिका श्रीमती नजमोनिसा युसुफोद्दीन शेख , छगन नारायणराव शिंदे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरवटी या शाळेचे सहशिक्षक त्याचबरोबर शिवाप्पा मारुती लुंगारे, सहशिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सह्याद्री नगर ,या सर्व शिक्षकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीमुळे केंद्र रविवारपेठ मधील व बाहेरून आलेल्या त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने नुकताच सन्मान सोहळा संपन्न करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे अधीक्षक वर्ग - २ श्री रंगनाथ राऊत, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मुमताज पठाण, कन्या प्रशालाचे मु अ कदम बप्पा , केंद्रप्रमुख कमलाकर कापसे, केंद्रीय मु.अ. रविवारपेठ उत्तरेश्वर मिटकरी, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयजी रापतवार हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. केंद्रीय मुख्याध्यापक उत्तरेश्वर मिटकरी यांनी आपल्या प्रास्ताविकात या तिन्ही शिक्षकांच्या कार्यकाळावर प्रकाश टाकला. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे अधीक्षक रंगनाथ राऊत यांनी देखील या शिक्षकांच्या सेवा कार्याची प्रशांसा केली.शिक्षण विस्तार अधिकारी मुमताज पठाण यांनी देखील याप्रसंगी आपले शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. या सन्मान सोहळा प्रसंगी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी सेवानिवृत्त होत असलेल्या तीनही शिक्षकांना त्यांच्या पुढील आयुष्यात निरोगी दीर्घायुष्य लाभावे यासाठी सदिच्छा व्यक्त केली. पुढे बोलताना रापतवार म्हणाले की या सर्वांनी आपली सेवा ही केवळ ड्युटी म्हणून न करता त्यांनी शाळेत आलेल्या विद्यार्थी तसेच त्यांना शाळेत पाठवलेल्या पालकांप्रति आपले कर्तव्य समजून सेवा बजावली. त्यांनी त्याच्या काळात अनेक उज्वल अशा पिढ्या निर्माण केल्या.या शिक्षकांनी त्यांच्या कार्यकाळात भारत देशासाठी सेवा बजावणारे अनेक उच्च पदस्थ अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर बनवले. आजही त्यांना असा एखादा विद्यार्थी भेटून सर मी तुमचा विद्यार्थी आहे असे सांगतो तेव्हा या शिक्षकांचा देखील विश्वास बसत नाही की खरंच आपण एवढे चांगले विद्यार्थी, एवढी चांगली पिढी घडविली आहे. अशा वेळी या शिक्षकांचा उर भरून येतो व आपली सेवा सार्थ झाल्याची भावना यावेळी निर्माण होत असल्याचे विजय रापतवार यांनी आपल्या भाषणात सांगितले.या कार्यक्रमाचे संचलन फारुख मणियार यांनी केले. यावेळी अंबाजोगाई तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील अनेक शिक्षक, शिक्षिका, त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचारी त्याचबरोबर गावकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रातील सर्व शिक्षक मुअ यांनी मदत केली तर राजाभाऊ राठोड , इरफान शेख , मारूती गव्हाणे , संजय पाडोळे व रावसाहेब राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले .

ग्राम परिवर्तन हेच रोटरीचे ध्येय – स्वाती हेरकळ

गरजू शेतकरी कुटूंबियांना २५ गायींचे वाटप; तर निराधार महिलांना पिठांच्या गिरणींचे वाटप

अंबाजोगाई -प्रतिनिधी

ग्राम परिवर्तनाच्या माध्यमातून शेतकर्यांच्या कुटूंबियांना उजीत आवस्था देण्यासाठी, त्यांच्या जगण्याला बळ देण्यासाठी रोटरी क्लबचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. असे प्रतिपादन रोटरीच्या प्रांतपाल स्वाती हेरकळ यांनी केले. अंबाजोगाई तालुक्यातील जोगाईवाडी येथे रोटरी परिवर्तन ग्राम योजनेतर्गत शेतकरी महिलांना २५ गायींचे वाटप करण्यात आले. तर तीन पिढीत व निराधार महिलांना पिठांचे गिरण्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून प्रांतपाल स्वाती हेरकळ बोलत होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, रोटरीचे उपप्रांतपाल गणेश वाघ, प्रमोद शिंदे, दिपक बागडे, जोगाईवाडीच्या सरपंच मनिषा दोडतले, मांडवा पठाणचे सरपंच गणेश रूद्राक्ष, हिवरा खुर्दचे सरपंच, महेश उजगरे, प्रविण भोईकर, रोटरीचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत, प्रशिक्षक संतोष मोहिते, प्रकल्प संचालक डॉ.अनिल केंद्रे, प्रा.रोहिणी पाठक, बालाजी घाडगे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना स्वाती हेरकळ म्हणाल्या की, रोटरी क्लब ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघटना नेहमी सामाजिक उत्तरदायित्व समजून काम करते. वंचित, उपेक्षित यांच्या जगण्याला बळ मिळावे यासाठी विविध उपक्रम राबविले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना नंदकिशोर मुंदडा यांनी रोटरी क्लबच्या कार्याचा गौरव केला.

त्यांच्या सर्व उपक्रमात सहभागी राहणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी उपस्थित शेतकरी महिलांना गायींचे वाटप तर पिढीत व निराधार महिलांना पिठांच्या गिरण्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील परदेशी यांनी केले. संचलन संतोष मोहिते यांनी तर उपस्थितांचे आभार गणेश राऊत यांनी मानले.

रोटरी क्लबच्या प्रांतपाल स्वाती हेरकळ या जोगाईवाडी येथे आल्या असता तेथील ग्रामस्थांनी त्यांचे सजविलेल्या बैलगाडीतून मिरवणूक काढली. हालक्यांचा खणखणाट व फटाक्यांची अतिशबाजी करत गावातून निघालेली ही मिरवणूक लक्षवेधी ठरली होती.

पोलीस बांधवांच्या मागण्या मान्य करण्यासाठी आयुष्यभर लढा उभारणार

बीड । प्रतिनिधी

पोलीस बांधवांच्या मागण्या मान्य करण्यासाठी आयुष्यभर लढा उभा करु आणि प्रश्न सोडवू असे पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्त सर्व पदाधिकार्यांनी आपल्या मनोगतामध्ये पोलीस बांधवांसाठी आवाज उठवला यावेळी मनोगत व्यक्त केले. सामाजिक कार्यासाठी तसेच पोलिस बांधवांच्या हक्कांसाठी काम करणार्या पोलीस हक्क संघर्ष संघटनेचा प्रथम वर्धापन दिन तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना गुणगौरव पुरस्कार सोहळ्याचा कार्यक्रम पेठ बीड पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पीआय मोदीराज, पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या अध्यक्षा जेबा अब्दुल कदिर शेख, उपाध्यक्ष अब्दुल कदीर शेख, सचिव राजेंद्र लहाने, प्रदेश कार्य अध्यक्ष गोपाळ कच्छवे, प्रदेश सचिव नजीमोद्दीन काझी, विभागीय अध्यक्ष ज्योती सिरसट, मराठवाडा महिला अध्यक्ष राजेश्वरी देबाजे,जिल्हा कार्याध्यक्ष परभणीचे बाळासाहेब राखे, परभणी जिल्हाध्यक्ष संतोष भाले, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.चाँद पटेल, बीड जिल्हाध्यक्ष अहेतोशामोद्दीन शेख, जिल्हा सचिव मोईनोद्दीन काझी समाजसेवक इलियास शेख, समाजसेवक फारुक मनियार, समाजसेवक इमरान इनामदार, वसीम शेख, सोहेल शेख आदींची उपस्थिती होती.यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रमुख अतिथी पीआय मोदीराज म्हणाले की, पोलीस हक्क संघर्ष संघटनेचे काम कौतुकास्पद आहे. राजेंद्र लहाने म्हणाले की, पोलीस हक्क संघर्ष संघटनेच्या माध्यमातून पोलीस बांधव आणि सामाजिक कार्याचे अनेक प्रश्न आम्ही पदाधिकारी यांनी सर्वांनी मिळवून सोडवले. ज्यामध्ये पोलीस बांधवांना सरकारी योजनांचा लाभ अथवा आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी यापुढे आम्ही शासन दरबारी प्रयत्न करु. बाळासाहेब राखे विधानभवनमधील अधिवेशनामध्ये जर कोणी पोलीस कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न आहेत याविषयी काही म्हटले नाहीत तर आम्ही एकदिवसीय लक्षवेधी आंदोलन करु, शासनाला जागे करु व पोलीस बांधवांना न्याय मिळवूनच देवू असा शब्द देत आहोत. संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा ॲड.जेबा शेख देखील म्हणाल्या की संघटनेचे काम करत असतांना घरावर तुळसीपत्र ठेवून आम्ही सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतले आहे व समाजाचे प्रश्न तन-मन-धनाने सोडविले आहेत त्यामुळे समाज भयमुक्त झाला, मजबुत झाला तसेच कार्य सर्व बांधवांनी करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी कार्यक्रमाला परभणी, बुलढाणा, पुणे, अहमदनगर, छ.संभाजीनगर, चिखली येथून संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य राजाभाऊ धाट यांनी समर्पित भावनेतून सेवाकार्य केले - सूर्यकांत केळकर

अंबाजोगाई (प्रतिनिधी) एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ज्यांची महाराष्ट्रात सर्वदूर ख्याती आहे. विद्यार्थीप्रिय आणि प्रयोगशील प्राचार्य म्हणून ज्यांचा आजही नांवलौकिक आहे. व ज्यांनी शिक्षणासोबतच वित्त, ग्रामीण आणि कृषी विकास, अ.भा.वि.प., सहकार भारती अशा विविध क्षेत्रातील संस्था आणि सेवाकार्याच्या उभारणीत तसेच विकास कार्यात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्या प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या बहुमोल कार्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अंबाजोगाई शहरात प्राचार्य धाट यांचे चाहते, विद्यार्थी, कुटुंबिय व विविध क्षेत्रातील सहकारी यांनी एकत्रित येत समारोह समितीच्या माध्यमातून सहस्त्रचंद्र दर्शन समारोहाचे रविवार, दिनांक ३० जून २०२४ रोजी आयोजन केले होते.

अंबाजोगाई शहरात प्रख्यात प्राचार्य राजाभाऊ गोपाळराव धाट यांच्या बहुमोल कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवारी सहस्त्रचंद्र दर्शन समारोह अनिकेत मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. मुख्य समारोहाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत केळकर (भूतपूर्व राष्ट्रीय संघटन मंत्री, सहकार भारती) हे होते. तर यावेळी व्यासपीठावर सतीश मराठे (सदस्य, केंद्रीय संचालक मंडळ, भारतीय रिझर्व बँक) हे प्रमुख अतिथी. आणि गौरवमूर्ती प्राचार्य राजाभाऊ धाट, सौ.सुलभा धाट, वसंतराव देशमुख, प्रा.डॉ.शरदराव हेबाळकर, डॉ.अ.द.पत्की या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी श्री व सौ धाट यांचा सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल, भेट वस्तू आणि चित्रकार उमेश डोंगे यांनी काढलेले अप्रतिम रेखाचित्र भेट देवून हृद्य सत्कार करण्यात आला. तसेच दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, उपस्थित सर्व सन्माननीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनी ही यथोचित सत्कार केला. प्रारंभी गौरव सोहळ्याचे प्रास्ताविक संयोजन समितीचे डॉ.अ.द.पत्की यांनी केले. सन्मानपत्राचे वाचन प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी यांनी केले. तर बहारदार सुत्रसंचालन अभिजीत जोंधळे यांनी केले. सन्मानपत्राचे लेखन प्रा.शाम बारडकर व प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी यांनी केले. यावेळी प्राचार्य धाट यांचे विषयी बोलताना प्रा.डॉ.शरदराव हेबाळकर यांनी ऋग्वेदातील संदर्भ देत आजच्या सहस्त्रचंद्र दर्शन समारोहाचे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आणि उपयोगीता असल्याचे नमूद केले. सहस्त्रचंद्र दर्शन समारोह करण्यामागील उद्देश सांगितला. व्यक्ती जीवन- समाज जीवन-राष्ट्र जीवनाचे महत्त्व विशद केले. तर वसंतराव देशमुख यांनी संघ परिवार, विद्यार्थी परिषद, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि सहकार भारतीच्या माध्यमातून प्राचार्य धाट यांनी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला. सतिश मराठे यांनी विद्यार्थी परिषद व सहकार भारती यांच्या उभारणीत तसेच ग्रामीण भागात शेती, बँक, संशोधन, विकास सोसायटीच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी प्राचार्य धाट यांनी केलेले कार्य मौलिक आहे असे प्रतिपादन केले. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य राजाभाऊ धाट यांनी मा.मा.क्षीरसागर यांच्यामुळे मी घडलो. भाशिप्र, दीनदयाळ बँक, दीनदयाळ शोध संस्थान, वृद्धांसाठी प्रकल्प उभारणी, संघ परिवार, विद्यार्थी परिषद, सहकार भारती याद्वारे देशभक्ती व आपुलकीचा संस्कार समाजात पुढे नेला. समाजात एकोपा वाढीस लागावा म्हणून प्रसंगी विरोधी विचारांच्या कार्यकर्त्यांशी मैत्री जोपासली असे सांगितले. विविध आठवणी सांगताना प्राचार्य धाट यांचा कंठ दाटून आला होता. हृद्य सत्कार केल्याबद्दल संयोजन समिती व उपस्थितांचे त्यांनी आभार मानले. अध्यक्षीय समारोप करताना सूर्यकांत केळकर यांनी सांगितले की, प्राचार्य धाट यांनी समाजासाठी नि:स्वार्थ, समर्पण भावनेतून अध्ययन व अध्यापन केले. त्यांनी केलेले सातत्यपूर्ण परीश्रम, ध्यासपूर्ण कार्याचा हा गौरव आहे. धाट यांनी समाजकार्य हा यज्ञ आरंभला. आजच्या काळात समर्पित भावनेतून समाजकार्य करणाऱ्या प्राचार्य धाट यांचा सत्कार होणे ही अभिनंदनिय बाब आहे असे गौरवोद्गार सूर्यकांत केळकर यांनी काढले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्राचार्य धाट यांच्या जीवनकार्याचा परीचय करून देणाऱ्या प्राजक्त गौरवग्रंथाचे विमोचन करण्यात आले. गौरवग्रंथाचे मुखपृष्ठ अतिशय देखणे असून त्यात ९ विभागात ६२ वाचनिय लेख आहेत. हा गौरवग्रंथ १६८ पानांचा आहे. ज्यात सचित्र वृत्तांत आहे. अत्यल्प कालावधीत गौरवग्रंथाचे सुरेख संपादन प्रा.सतिश हिवरेकर, प्रा.शाम बारडकर, प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी, प्रा.डॉ.दिगंबर मुडेगावकर आणि श्रीकांत देशपांडे यांनी केले आहे. यासाठी माणिक जैन यांचे मोठे सहकार्य लाभले. प्रारंभी सकाळी शांती हवन, तुला करण्यात आली. त्यानंतर पहिल्या सत्राचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलन आणि भारतमातेच्या प्रतिमापूजनाने करण्यात आले. पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.सतिश पत्की हे होते. पहिल्या सत्रात मला भावलेले धाट सर या विषयावर ऍड.किशोर गिरवलकर, संजय सराफ, प्रा.प्रदीप रत्नपारखी, विष्णु बोबडे, गिरीश कऱ्हाडे, महेश वैद्य, सौ.रजनी सोनवळकर, रमेश पांडव, उन्मेष मातेकर, भगवानराव शिंदे, भक्तराम हळबे, सौ.सुजाता धाट, निवृत्ती दराडे, डॉ.गोपाळ चौसाळकर यांनी नेमक्या शब्दांत धाट सरांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू, भूमिका, स्वभाव वैशिष्टे, कार्यकर्तृत्व उलगडून दाखवत स्वानुभव कथन केले. गौरवपूर्ण उल्लेख करून या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्रा.सतिश पत्की यांनी केला. बाहेरगावाहून आवर्जून उपस्थित असलेले विष्णू बोबडे (ठाणे), नंदू पावगी (पालघर), गणेशराव गाडगीळ (सांगली), उमेश कुलकर्णी या मान्यवरांचा धाट परिवाराकडून सहर्ष स्वागत करण्यात आले. कार्यक्रम स्थळी चित्रकार उमेश डोंगे यांनी काढलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. प्रथम सत्राचे सुत्रसंचालन प्रा.शाम बारडकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार संकेत धाट यांनी मानले.

कमी व्याजदरात कर्ज; कठीण काळात ठरते संजीवनी, शेतकऱ्यांनो सरकारची 'ही' योजना माहिती आहे का?

सरकारकडून शेतकऱ्यांसाठी गरिबांसाठी विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजनांच्या माध्यनातून सरकार शेतकऱ्यांना गरिबांना आर्थिक पाठबळ देण्याचा प्रयत्न करते. शेतकऱ्यांसाठी सरकारनं अशीच एक योजना सुरु केली आहे. किसान क्रेडिट कार्ड योजना असं या योजनेचं नाव आहे. भारतातील कोणताही शेतकरी याचा लाभ घेऊ शकतो. शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे हा या कर्ज योजनेचा उद्देश आहे.

नेमकी काय आहे किसान क्रेडिट कार्ड योजना?

शेतकऱ्यांना शेतीसाठी नेहमी पैशांची गरज असते. पीक लावण्यासाठी, खते, बी बियणं, पाणी देण्यासाठी आणि त्याची काळजी घेण्यासाठी शेतकऱ्याला पैशांची व्यवस्था करावी लागते. अनेकवेळा शेतकरी सावकार आणि बँकांकडून चढ्या व्याजदराने कर्जही घेतात. अशा स्थितीत पीक न आल्याने किंवा उत्पादन न मिळाल्याने शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकतात. सरकारने शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी किसान क्रेडिट कार्ड कर्ज योजना सुरु केली आहे. केंद्र सरकारच्या या योजनेंतर्गत शेतकरी आपली जमीन गहाण ठेवून अत्यंत कमी व्याजदरात शेतीसाठी कर्ज घेऊ शकतात. सरकारने शेतकऱ्यांसाठी आणलेल्या या

कर्ज योजनेला किसान क्रेडिट कार्ड किंवा ग्रीन कार्ड म्हणतात. या योजनेत शेतकरी ४ टक्के व्याजाने तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकतात.

किसान क्रेडीट कार्ड ही योजना १९९८ मध्ये सुरु

किसान क्रेडीट कार्ड ही योजना १९९८ मध्ये भारत सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि नाबार्ड यांच्या सहकार्यानं सुरु केली होती. या योजनेंतर्गत शेतकरी त्यांच्या जवळच्या बँकेत जाऊन, त्यांच्या जमिनीची कागदपत्रे जमा करुन आणि कर्ज घेण्याची सामान्य कागदपत्रे पूर्ण करुन कर्ज घेऊ शकतात. किसान क्रेडिट कार्ड योजनेंतर्गत, सरकार शेतकऱ्यांना केवळ ४ टक्के व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देते. मात्र, यासाठी काही अटी आहेत ज्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

कर्ज योजनेची माहिती

किसान क्रेडिट कार्ड योजनेची सुरुवात केंद्र सरकारने १९९८ मध्ये केली होती. भारतातील कोणताही शेतकरी याचा लाभ घेऊ शकतो. शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे हा या कर्ज योजनेचा उद्देश आहे. यामध्ये शेतकरी चार टक्के व्याजाने तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकतात. यापेक्षा जास्त कर्ज शेतकऱ्यांनी घेतल्यास व्याजदर वाढतो. किसान क्रेडिट कार्डवर एकूण ९ टक्के व्याजदर आहे. या योजनेत केंद्र सरकारकडून २ टक्के अनुदान दिले जाते. याशिवाय एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी कर्जाची परतफेड केल्यास शेतकऱ्यांना ३ टक्के प्रोत्साहनपर रक्कमही दिली जाते. अशा प्रकारे या कर्जावरील व्याजदर केवळ चार टक्केच राहतो. म्हणूनच याला देशातील सर्वात स्वस्त कर्ज म्हटले जाते, जे भारतातील शेतकऱ्यांना उपलब्ध आहे.

बिहार सरकारचा मोठा निर्णय, शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जावरील ९० टक्के व्याज माफ

बिहारच्या सहकारी बँकांनी २०२४-२५ मध्ये ९० हजार शेतकऱ्यांना कृषी कर्ज देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. सरकारने गेल्या वर्षीपेक्षा १० हजार अधिक शेतकऱ्यांना कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. या शेतकऱ्यांना २७० कोटी रुपये कर्ज म्हणून वाटण्यात येणार आहेत. गतवर्षी ८० हजार शेतकऱ्यांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, त्यासोबतच पुढील तीन वर्षांसाठी प्रत्येक वर्षी १० हजार शेतकऱ्यांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापूर्वी, गेल्या वर्षाच्या अखेरीस, बिहार सरकारने दोन लाख शेतकऱ्यांच्या सहकारी कर्जावरील ९० टक्के व्याज माफ करण्याचे सांगितले होते.

खरीप हंगामासाठी शिफारस केलेले सोयाबीनचे आघाडीचे वाण

खरीप हंगामासाठी शेतकरी सोयाबीन लागवडीच्या तयारीत व्यस्त आहेत. परंतु, चांगले उत्पादन घेण्यासाठी योग्य वाण निवडण्याबाबत संभ्रम असतो. सोयाबीनचे शिफारस केलेले पाच टॉप वाण आहेत जे अधिक उत्पादन मिळवून देतील

जेएस २०३४ : पिकापासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी, आपण जेएस २०३४ पेरू शकता. या जातीच्या दाण्यांचा रंग पिवळा, फुलांचा रंग पांढरा आणि शेंगांचा आकार सपाट असतो. या जातीची पेरणी कमी पाऊस असतानाही करता येते. कमी पाऊस असलेल्या ठिकाणी शेतकरी या जातीची पेरणी करून चांगले उत्पादन घेऊ शकतात. सोयाबीन २०३४ जातीचे एक हेक्टरमध्ये सुमारे २४-२५ क्विंटल उत्पादन मिळते. हे पीक ८०-८५ दिवसात पक्व होते.

एमएसीएस १४०७ : ही सोयाबीनची नवीन विकसित केलेली जात आहे. आसाम, पश्चिम बंगाल, झारखंड, छत्तीसगड आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये याची लागवड केली जाते. ही जात ३९ क्विंटल उत्पादन देते. तसेच, ही जात गर्डल बीटल, लीफ मायनर, लीफ रोलर, स्टेम फ्लाय यांसारख्या प्रमुख कीटकांना प्रतिरोधक आहे. ही जात ईशान्य भारतातील पावसावर अवलंबून असलेल्या परिस्थितीसाठी योग्य आहे. ही जात १०४ दिवसांत तयार होते. त्यात पांढरी फुले, पिवळ्या बिया आणि काळी हिलम असते. याच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण १९.८१ टक्के आहे.

जेएस २०६९ : सोयाबीनची जेएस २०६९ जात ही लवकर पिकणारी जात आहे. या जातीच्या पेरणीसाठी एकरी ४० किलो बियाणे लागते. या जातीपासून एक हेक्टरमध्ये सुमारे २२-२६ क्विंटल उत्पादन मिळू शकते. ही जात तयार होण्यास ८५ ते ८६ दिवस लागतात.

बीएस ६१२४ : या जातीच्या पेरणीसाठी प्रति एकर ३५-४० किलो बियाणे आवश्यक आहे. उत्पादनाबाबत बोलायचे झाले तर एका हेक्टरमध्ये या जातीपासून सुमारे २० ते २५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. ही जात तयार होण्यासाठी ९० ते ९५ दिवस लागतात. या जातीची फुले जांभळ्या रंगाची आणि पाने लांब असतात. तसेच याच्या बियांमध्ये तेलाचे प्रमाण २१ टक्के आहे.

एनआयसी १८१ : सोयाबीनच्या या जातीची वाढ मर्यादित आहे. हे पिवळे मोज़ेक आणि टार्गेट लीफ स्पॉट रोगांना प्रतिरोधक आहे. भारतातील सपाट भागात या जातीची लागवड केली जाते. विशेषत: मध्य प्रदेशात, या जातीला परिपक्व होण्यासाठी ९३ दिवस लागतात आणि त्याचे सरासरी उत्पादन १६-१७ क्विंटल प्रति हेक्टर आहे.

बाजरीच्या अधिक उत्पादनासाठी तज्ज्ञाच्या टिप्स

कृषी शास्त्रज्ञांच्या मते, जुलैचा पहिला पंधरवडा हा बाजरीच्या पेरणीसाठी योग्य काळ आहे. १० जूननंतर ५०-६० मिमी पाऊस झाला तरी बाजरीची पेरणी करता येते. तर १५ जुलैपासून विलंब झाल्यानंतर त्याचे उत्पादन घटते. अशा परिस्थितीत नर्सरी पद्धतीनेही पेरणी करता येते, ज्यामुळे उशिरा पेरणीच्या तुलनेत बरेच चांगले उत्पादन मिळते. शेतकऱ्यांनी लक्ष दिल्यास या पिकाची उत्पादकता दुप्पट वाढू शकते. बाजरी भारतात प्रामुख्याने वालुकामय आणि चिकणमाती असलेल्या भागात घेतली जाते. या प्रकारच्या मातीमध्ये साधारणपणे सेंद्रिय कार्बन, नायट्रोजन आणि फॉस्फरसचे प्रमाण कमी असते.

बाजरीच्या चांगल्या उत्पादनासाठी काय करावे?

ज्या शेतात बाजरी पेरायची आहे त्या शेतात उन्हाळ्यात १-२ वेळा नांगरणी करावी आणि ३-४ वर्षातून एकदा खोल नांगरणी करावी. रोगांपासून बचाव करण्यासाठी आणि आर्द्रता वाचवण्यासाठी हे खूप फायदेशीर आहेत. पावसावर किंवा पावसाच्या प्रदेशात, फक्त ७०-७५ दिवसात पिकणाऱ्या वाणांची पेरणी करावी, जसे की एचएचबी-६७, एचएचबी-६०, आरएचबी-३०, आरएचबी-१५४ आणि राज-१७१ इ. जेथे २-३ सिंचन पाणी उपलब्ध आहे, तेथे सरकारी किंवा खाजगी क्षेत्राने विकसित केलेल्या वाणांची पेरणी ८० दिवसांपेक्षा जास्त कालावधीत करता येते. शिफारशीनुसार हेक्टरी ३ ते ५ किलो बियाणे योग्य प्रमाणात वापरावे, जेणेकरून पावसाळ्यात एकरी ६०-६५ हजार झाडे आणि ७५-८० हजार झाडे सिंचनात मिळू शकतील.

तण नियंत्रण : पेरणीनंतर १५-३० दिवसांनी तण काढण्यासाठी योग्य वेळ आहे. हे केवळ तणांवर नियंत्रण ठेवत नाही, तर जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी देखील हा एक चांगला उपाय आहे. याशिवाय जमिनीतील वनस्पतींच्या मुळांपर्यंत हवा वाहू देते. तणनाशक म्हणून, ॲट्राझिन (५० डब्ल्यूपी) बाजरीमध्ये ४०० ग्रॅम प्रति एकर या प्रमाणात पेरणीनंतर लगेच फवारणी करावी.

रोग आणि कीड : रोग आणि कीड टाळण्यासाठी, पेरणीपूर्वी बियाणे प्रक्रिया करावी. याशिवाय बियाण्यांवर जिवाणू खतांची (ॲझोस्पिरिलम आणि फॉस्फेट विरघळणारे जिवाणू) प्रक्रिया करावी. पेरणीनंतर २० दिवसांनंतर जिथे कमी झाडे आहेत, रिकामी जागा भरावी आणि जिथे दाट झाडे आहेत, तिथे पातळ कराव्यात जेणेकरून प्रति एकर इच्छित संख्या मिळेल.

खताची मात्रा : पेरणीच्या वेळी नत्राची अर्धी मात्रा आणि स्फुरदाची संपूर्ण मात्रा (पावसाच्या क्षेत्रासाठी ४० किलो नायट्रोजन + २० किलो स्फुरद आणि बागायती क्षेत्रासाठी १२५ किलो नायट्रोजन + ६० किलो स्फुरद) आणि उर्वरित नत्र जमिनीत टाका. पेरणीपूर्वी २० दिवसांनी आणि ४० दिवसांनी वापरावे.

पाणी व्यवस्थापन : जेथे सिंचनासाठी पाणी उपलब्ध आहे, तेथे उगवण आणि फुलोऱ्याच्या वेळी आणि बियांच्या दुधाळ अवस्थेत सिंचन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसावर अवलंबून असलेल्या भागात ओलावा टिकवण्यासाठी विविध उपाययोजना कराव्यात.

माहिती करून घ्या शेतकऱ्यांचे मित्र असलेले कीटक

काही कीटक शेतकऱ्यांचे मित्र आहेत, ते शत्रू कीटकांपासून पिकांचे संरक्षण करतात, बंपर उत्पादनात ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. यामुळे शेतकऱ्यांना या कीटकाची माहिती असणे गरजेचे आहे. कारण ओळख पटत नसल्याने शेतकरी रासायनिक फवारणी करून त्यांचा जीव घेतात. हे मित्र कीटक केवळ शत्रू कीटकांनाच मारत नाहीत तर पिकांचे उत्पादन वाढवण्यासही त्यांची खूप मदत होते. त्याच वेळी, सामान्यत: जेव्हा शेतकरी त्यांच्या बागेत आणि पिकांमध्ये कोणत्याही प्रकारची कीटक पाहतात तेव्हा ते त्या किडीला पिकाचा शत्रू समजतात आणि त्यावर रसायनांची फवारणी करतात. हे चुकीचे आहे कारण कधी कधी असे केल्याने शेतकऱ्यांचे मित्र कीटकही मरतात.

रेड लेडी बर्ड बीटल कीटक :

रेड लेडी बर्ड बीटल कीटक एखाद्या शेतकऱ्याच्या बागेत आणि शेतात उगवलेल्या पिकांमध्ये दिसला तर तो शेतकरी भाग्यवान आहे. वास्तविक, ही कीटक शेतकऱ्यांच्या पिकांचे त्यांच्या बागांवर आणि पिकांवर हल्ला करणाऱ्या अनेक शत्रू कीटकांपासून संरक्षण करते. रेड लेडी बर्ड बीटल कीटक आणि त्याच्या अळ्या बागेसाठी आणि पिकांसाठी फायदेशीर आहेत. जर आपण ओळखीबद्दल बोललो तर, रेड लेडी बर्ड बीटल कीटक सामान्यत: लाल किंवा केशरी रंगाचे असतात. या कीटकांच्या शरीरावर काळ्या खुणा

असतात. तथापि, काही लेडी बर्ड बीटल काळे देखील असतात आणि त्यांच्यावर लाल खुणा असतात.

शेतकऱ्याचा मित्र कोळी : कोळ्याचे नाव तुम्ही ऐकले असेलच. त्यांच्या अनेक प्रजाती आढळतात. जे घरापासून शेतापर्यंत आढळतात. हे पिकांना हानी पोहोचवणाऱ्या विविध प्रकारच्या हानिकारक कीटकांना पकडून नष्ट करते, त्यामुळे पिकांना इजा होत नाही.

प्रार्थना मँटिस कीटक : सामान्यत: शेतकरी मँटीस कीटकाला टोळ समजतात आणि मारतात. तर मांटिस कीटक ही शेतकऱ्यांची अनुकूल कीटक आहे. हे किडे खरीप पिकांवर हल्ला करणाऱ्या हानिकारक कीटकांना खातात. हे किडे हिरवे प्रौढ टोळकाड्यासारखे दिसतात. शेतकऱ्यांनी या किडीला मारू नये कारण ही कीटक शेतकऱ्यांचा मित्र आहे.

ट्रायकोग्राम कीटक : ट्रायकोग्रामा नावाची कीटक देखील हानिकारक कीटकांना नष्ट करण्यासाठी खूप उपयुक्त आहे, ही कीटक इतर कीटकांमुळे प्रभावित होणारी पिके वाचविण्यात मदत करते. हे निवडकपणे पानांद्वारे झाडांना हानी पोहोचवणारे कीटक काढून टाकते. तथापि, पानांच्या बाहेरून हल्ला करणाऱ्या कीटकांवरच ते प्रभावी आहे. जर कीटक झाडाच्या आत असेल तर ते प्रभावी नाही. हा कीटक त्याच्या हलक्या रंगाच्या अंड्यांवरून ओळखला जातो.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१६९८ : थॉमस सावेरी यांनी पहिले स्टीम इंजिन चे पेटंट मिळवले.
१८५० : बेंजामिन लेन या शास्त्रज्ञाला 'गॅस मास्क'चे अनेरिकन पेटंट बहाल
१८६२ : कलकत्ता येथील उच्च न्यायालयाची स्थापना उच्च न्यायालयीन कायदा १८६१ अंतर्गत करण्यात आली.
१८६५ : 'साल्व्हेशन आर्मी' या सेवाभावी संस्थेची स्थापना
१९४० : सुभाषचंद्र बोस यांना कलकत्ता येथे स्थानबद्ध करण्यात आले.
१९६२ : रॉजर्स, आरकॅन्सास येथे पहिले 'वॉल मार्ट' स्टोअर उघडले.
१९७२ : भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी सिमला करारावर स्वाक्षर्या केल्या.
१९८३ : कल्पक्कम, तामिळनाडू येथील अणूऊर्जा केंद्र सुरू झाले.
१९९४ : चित्रकार जगदीश स्वामीनाथन यांची मध्यप्रदेश सरकारच्या कालिदास सन्मानासाठी निवड
२००१ : बिहारमधील चंपारण्य जिल्हयातील केसरिया गाव येथे ०४ फूट उंचीचा जगातील सर्वात मोठा बौध्द स्तूप सापडला.
२००२ : स्टीव फॉसेट हा उष्ण हवेच्या फुग्याद्वारे पृथ्वी प्रदक्षिणा करणारा सर्वप्रथम व्यक्ती झाला.
२००४ : युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनला जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट केलं.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६२ : नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ विल्यम हेन्री ब्रॅग यांचा जन्म.
१८७७ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन लेखक हेर्मान हेस यांचा जन्म.
१८८० : गणेश गोविंद तथा 'गणपतराव' बोडस नट व गायक, 'गंधर्व नाटक मंडळी'चे एक संस्थापक (मृत्यू: २३ डिसेंबर १९६५)
१८९३ : स्वतंत्र भारतातील पंजाब राज्याचे पहिले राज्यपाल व आंध्रप्रदेश राज्याच्या स्थापने नंतरचे आंध्रप्रदेश राज्याचे पहिले राज्यपाल चंदूलाल माधवलाल त्रिवेदी यांचा जन्मदिन.
१९०४ : रेने लॅकॉस्त फ्रेन्च लॉन टेनिस खेळाडू आणि 'पोलो' टी शर्टचे जनक (मृत्यू: १२ आक्टोबर १९९६)
१९०६ : नोबल पुरस्कार विजेते अमेरिकन भौतिकीतज्ञ बेटे हान्स आल्ब्रेख्ट यांचा जन्म.
१९२२ : पिअर कार्डिन फ्रेन्च फॅशन डिझायनर
१९२३ : जवाहरलाल अमोलकचंद दर्डा स्वातंत्र्यसैनिक व राजकारणी (मृत्यू:)
१९२५ : पॅट्रिक लुमूंबा कॉंगोचे पहिले पंतप्रधान (मृत्यू: १७ जानेवारी १९६१)
१९२६ : विनोदी लेखक वि. आ. तथा विनायक आदिनाथ बुवा यांचा जन्म.
१९३० : कार्लोस मेनेम अर्जेंटिनाचे ५० वे राष्ट्राध्यक्ष
१९४६ : प्रसिद्ध भारतीय लेखक, पत्रकार व साहसी कादंबरीकार अरुपकुमार दत्त यांचा जन्मदिन.
१९५४ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट पार्श्वगायक मुहम्मद अझीज यांचा जन्मदिन.
१९६० : हिंदुस्थानी शास्त्रीय परंपरेतील प्रसिद्ध लखनऊ तबला घराण्याची शाखा असलेल्या जोशी जोशी घराण्याचे सदस्य भारतीय गायक पंडित संतोष जोशी यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय व्यावसायिक पॅरा-बॅडमिंटनपटू व उत्तरप्रदेश राज्यातील गौतमबुद्ध नगरचे जिल्हा दंडाधिकारी सुहास ललीनाकेरे यथिराज यांचा जन्मदिन.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५६६ : नोट्रे डॅम प्रसिद्ध फ्रेंच ज्योतिषी, गणितज्ञ व भविष्यवेत्ता (जन्म: १४ डिसेंबर १५०३)
१७७८ : रुसो फ्रेन्च विचारवंत, लेखक व संगीतकार (जन्म: २८ जून १७१२)
१८४३ : डॉ. सॅम्यूअल हानेमान होमिओपाथी या वैद्यकीय उपचारपद्धतीचे जनक (जन्म: १० एप्रिल १७५५)
१९५० : युसूफ मेहेर अली समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक व मुंबईचे महापौर (जन्म: २३ सप्टेंबर १९०३)
१९६१ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी आत्महत्या केली (जन्म: २१ जुलै १८९९)
१९९९ : मारिओ पुझो अमेरिकन लेखक (जन्म: १५ आक्टोबर १९२०)
२००७ : दिलीप सरदेसाई क्रिकेटपटू (जन्म: ८ ऑगस्ट १९४०)
२०११ : चतुरानन मिश्रा केंद्रीय कृषी मंत्री, कामगार नेते, कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: ७ एप्रिल १९२५)
२०१३ : कॉम्पुटर माउस चे शोधक डगलस एंगलबर्ट यांचे निधन. (जन्म: ३० जानेवारी १९२५)

केंद्र सरकारने दूध पावडर आयातीचा निर्णय मागे घ्यावा- राजू शेट्टी

कोल्हापूर : केंद्र सरकारने दोन दिवसांपूर्वी १० हजार टन दूध पावडर आयात करण्यासाठी परवानगी दिली आहे. विशेष म्हणजे दुधाचे दर कोसळले असताना हा निर्णय घेण्यात आल्याने दूध उत्पादकांना मोठा फटका बसणार आहे. दूध पावडर आयात केल्याने देशांतर्गत दूध उत्पादकांचे मोठे नुकसान होऊ शकते. सध्या, दुधाचे दर आधीच कमी आहेत आणि अतिरिक्त दूध उत्पादनासह, दुधाच्या पावडरमध्ये रूपांतरित केल्याने या आयात निर्णयामुळे योग्य भाव मिळणार नाही, ज्यामुळे आपल्या देशांतर्गत दूध उत्पादकांच्या आर्थिक स्थिरतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. यामुळे केंद्र सरकारने दूध पावडर आयातीचा घेतलेला निर्णय तातडीने मागे घ्यावा अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. देशातील व राज्यातील दूध उत्पादनाचा खर्च वाढल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. केंद्र सरकारने भेसळयुक्त दूध व दूध पावडर तयार करणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असून, त्या कंपन्यांमुळेच बाजारात दुधाची कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे. ही परिस्थिती अशीच राहिल्यास अजूनही दर झपाट्याने घसरण्याची शक्यता आहे. यामुळे दूध उत्पादक व ग्राहक या दोघांनाही याचा मोठा फटका बसणार असल्याचे शेट्टी यांनी निवेदनात म्हटले आहे.

कृषीमंत्र्यांच्या जिल्ह्यातच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय शासकीय मदतीपासून वंचित

गेल्या ६ महिन्यातील १०३ शेतकरी आत्महत्यांपैकी केवळ ८ शेतकरी कुटुंबियांनाच मदत

बीड

कधी नैसर्गिक तर कधी प्रशासकीय धोरणांमुळे शेतकरी सातत्याने आर्थिक अडचणीत असुन मोठ्या प्रमाणात वाढलेला उत्पादन खर्च,खते बी -बियाणे यांच्या किंमतीत दिवसेंदिवस वाढ,शेती मालाला योग्य भाव न मिळणे.गतवर्षी जिल्ह्यात पेरण्या झाल्यानंतर पावसाने दगा दिला.काही भागात दुबार पेरणी करावी लागली. दुबार पेरणी केल्यानंतर हातातोंडाशी आलेला घास दुष्काळामुळे हिरावला.सरासरी पेक्षा पाऊस कमी पडल्याने मार्च महिन्यात विहिर, बोअरवेल,तलाव कोरडे पडल्याने शेतकऱ्यांना फळबागा मोडाव्या लागल्या.यामुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांने नैराश्यातुन आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलले.१ जानेवारी २०२४ ते २८ जुन २०२४ या सहा महिन्यांच्या कालावधीत १०३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

यातील केवळ ८ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत मिळाली असुन ईतर मदतीपासून वंचित आहेत.त्यामुळे कृषी मंत्री महोदयांच्या बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांनाच वेळेवर मदत न मिळणे लाजीरवाणी बाब असुन तातडीने चौकशी प्रलंबित प्रकरणे मार्गी लाऊन मदत देण्यात यावी.तसेच उच्च न्यायालयाचे १५ दिवसात मदत मिळणे बंधनकारक असताना सहा महिने मदत न मिळाल्याने प्रकरणे प्रलंबित ठेवण्यास जबाबदार आधिका-यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना प्रकरणात प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१ जुलै सोमवार रोजी राज्यातील कृषीक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ''कृषीदिनी'' जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, कृषीमंत्री धनंजय मुंडे, विभागीय आयुक्त यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, शेख मुस्ताक,आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, जिल्हा सचिव रामधन जमाले,तालुका संघटक दत्तात्रय सुरवसे आदी सहभागी झाले होते. बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२४ ते २८ जुन २०२४ या मागील ६ महिन्यांच्या कालावधीत जानेवारी मध्ये १८, फेब्रुवारी मध्ये १४ , मार्च मध्ये १२ , एप्रिल मध्ये १३,मे मध्ये १४ , आणि जुन महिन्यात ३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.यातील ५ शेतकरी मदतीस अपात्र ठरले असुन ५२ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव चौकशीसाठी अद्याप प्रलंबित आहेत तर ४६ शेतकरी शासनाच्या एक लाख रुपयांच्या मदतीस पात्र आहेत.मात्र त्यातील केवळ ८ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या १ लाख रुपये मदतीचा निधी मिळाला आहे. त्यामुळे चौकशी अभावी मदतीपासून प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लाऊन तातडीने मदत देण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करा- डॉ.ढवळे

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश असताना तातडीने मदत न मिळणे,वैद्यकीय अहवाल तातडीने सादर न करणे व प्रकरणात दिरंगाई केल्याबद्दल पोलिस निरीक्षक तसेच तहसिल प्रशासनातील अधिकाऱ्यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना असुन चौकशी अभावी प्रलंबित प्रकरणात जबाबदार पोलिस प्रशासन तसेच तहसिल प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

०१ जुलै २०२४ रोजी किमान समान कार्यक्रमाअंतर्गत आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली मानसिक आरोग्य या विषयी ब्रेन क्युअर हॉस्पीटल जालना रोड, बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात मानसिक आरोग्य जनजागृती या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सोनी यांनी उपस्थीत लोकांना मानसिक आरोग्य आणि कायदयाविषयी माहिती सांगितली व कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

सदरील कार्यक्रमात मिथुन जोगदंड यांनी सामान्य मानसिक आरोग्य कसे निरोगी ठेवता येईल यासाठी पाच उपाय सांगितले १. सकाळी पहाटे लवकर उठणे २. आपली स्वतःची शरीर स्वच्छता करणे. ३. नियमीत व्यायाम करणे. ४. सकस आणि पौष्टिक आहार घेणे. ५. संध्याकाळी लवकर वेळेवर झोपणे. हया पाच उपयांचा प्रत्येक व्यक्तीने दैनदिन जिवनात योग्य असा वापर केला तर प्रत्येक व्यक्तीचे शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य हे निरोगी राहील. जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला आपले दिवसभराचे जिवन आनंदात आणि उत्साहात जगता येईल. असे मत व्यक्त केले. आरोग्याच्या संदर्भात मार्गदर्शन करताना अशोक तांगडे यांनी सांगितले की कुठलाही निर्णय घेताना दीड मिनीट विचार करून मगच शांत डोक्याने निर्णय घ्यावा. म्हणजे आपल्याकडून चुकीचा निर्णय घेतला जात नाही. दुस-याच्या प्रभावात येउन आपण आपल्या आयुष्याचे निर्णय घेउ नये. आपली क्षमता आपली बौध्दीक कुवत आपली परिस्थिती यांचा विचार करूनच आयुष्यातील महत्वाचे निर्णय घ्यावेत.

व्यसनातुन मुक्त होणे हा आयुष्यातील सर्वांत सुंदर निर्णय आहे. त्यामुळे आपण व्यसनमुक्त आयुष्य जगावे व दुस-यालाही व्यसनातून मुक्त करण्यास मदत करावी असे आव्हान अशोक तांगडे यांनी केले. आयुष्यात वेळ ही खूप महत्वाची गोष्ट आहे. त्याचा सदुउपयोग करावा व वेळ सत्कारनी लावावी. आपले सकारात्मक मित्र बनवावे समाजाला उपयोगी काम करावे तसेच आपला आणि समाजाचा विकास होईल असे वर्तन करावे असे तत्वशील कांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले.

जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त पदांची जाहिरात काढून भरती करा- मोरे

बीड । प्रतिनिधी

पोलीस पाटील गावपातळीवरील त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांची माहिती पोलीस ठाण्यास वेळेत उपलब्ध करुन देतात परंतू अनेक गावात आजमित्तीला १५ ते २० वर्षांपासून अनेक गावांना पोलीस पाटीलच नाही त्यामुळे जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त पदांची जाहिरात काढून भरती करा अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केली आहे.

पोलीस पाटील गावपातळीवरील त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांची माहिती पोलीस ठाण्यास वेळेत उपलब्ध करुन देतात त्यामुळे महसुल व गृह विभाग तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस पाटलांची भूमीका अत्यंत महत्वाची असते. बीड जिल्ह्यातील १३२२ गावात आजघडीला केवळ २०० पोलीस पाटील कार्यरत आहेत. पोलीस पाटील ११२२ पद भरती करण्यासंदर्भात

महसुल मंत्री यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व जिल्हाधिकारी बीड यांना दि.२३/१२/२०२२ रोजी सूचित केले.

त्यावर जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.१६.०१.२०२३ ते २९.०४.२०२३ पर्यंत अर्ज मागवून नियुक्ती देण्या संदर्भात वेळापत्रक ठरविले होते. परंतू त्यांची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही त्यामुळे आजतागायत सदर भरती प्रक्रीया झालेली नाही या अगोदर सामाजिक कार्यकर्ते मुकेश विठ्ठलराव रसाळ यांनीही वेळोवेळी शासन स्तरावर पाठपुरावा केला असून अनेक गावात १५ ते २० वर्षांपासून पोलीस पाटीलच नाहीत त्यामुळे जिल्ह्यात पोलीस पाटील भरती प्रक्रिया स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापुर्वी ०८ दिवसाच्या आत काहीही प्रक्रिया या विषयावर न झाल्यास या संदर्भात विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर, गृह विभागाचे प्रधानसचिव, महसुल विभागाचे प्रधानसचिव व राज्याच्या मुख्य सचिव या सर्वांची भेट घेवून जिल्हाधिकारी यांची तक्रार करु असेही पत्रकाद्वारे बाळासाहेब मोरे यांनी म्हटले आहे.

पर्यावरण टिकविणे काळाची गरज-कटके

छोटेवाडी येथे वसंतराव नाईक जयंती उत्साहात

बीड । प्रतिनिधी

निसर्गाचा समतोल अबाधित ठेवण्यासाठी पर्यावरण संगोपन आणि संवर्धन करणे काळाची गरज आहे.कारण निसर्गावरचं मानवी जीवन टिकून आहे. त्यामुळे प्रत्येकाने झाडे लावून ती जोपासावीत असे प्रतिपादन सरपंच अंगद कटके यांनी व्यक्त केले. माजलगाव तालुक्यातील छोटेवाडी येथे सोमवार (दि.१)रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सरपंच अंगद कटके बोलत होते.

यावेळी पत्रकार सुनिल डोंगरे, एस.एन.जमदाडे, ए.एम.वगरे, एस.व्ही.चव्हाण, ऑपरेटर रामप्रसाद प्रधान, सेवक अजित कटके, ग्रामरोजगार सेवक गोरख दळवी,ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलतांना सरपंच अंगद कटके म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांनी आपल्या कार्यकाळात पर्यावरणाचा समतोल अबाधित ठेवण्यासाठी या राज्यात हरितक्रांती धोरण अमलात आणले. मानवी जीवनमूल्यात पर्यावरणाचे महत्त्व पटवून सांगितले. आज आपण त्यांच्या जयंतीदिनी ग्रामपंचायत अंतर्गत वृक्ष लागवड करत आहोत. त्यामुळे आगामी काळात या वृक्षांचा ग्रामस्थांना फायदा होईल.असे मनोगत व्यक्त केले. दरम्यान छोटेवाडी येथे विविध प्रजातींची झाडे लावण्यात आली. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

झाडांचं संगोपन केलं म्हणून

छोटेवाडी ग्रामपंचायतने लावलेल्या झाडांचे संगोपन करुन झाडांना जीवदान देण्याचे काम तरुणांनी केले. त्यामुळे सरपंच अंगद कटके यांच्यासह नागरिकांनी भागवत इंगळे, संदिप सोळंके, राहुल माफाडे, सुभाष घाडगे यांचा सत्कार केला.

पाटोदा-चुंबळी रस्ता मोजणीबाबत नोटीस जारी

बीड: उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. ८ मार्च २०२३ रोजीच्या आदेशानुसार आणि जिल्हाधिकारी बीड यांच्या दि. ११ मार्च २०२३ रोजीच्या आदेशानुसार मौजे पाटोदा बीड येथील पाटोदा-चुंबळी रस्त्याच्या कामी उप अधीक्षक भूमी अभिलेख बीड कार्यालयाकडून दि. ३ जुलै २०२४ ही तारिख निश्चित करण्यात आलेली आहे. या मोजणीबाबत लगतधारकास नोटीस देण्यात आलेल्या असून तसेच तहसीलदार पाटोदा यांच्याकडील दि. १३ जानेवारी २०२३ रोजीच्या पत्रानुसार कळविल्यानुसार ज्यांची नावे मोजणी अर्जात नमूद नाहीत अशा पाटोदा-चुंबळी रस्त्यालगतच्या सर्व सर्व्हे नंबरच्या हितसंबधितांना नोटीस देणे आवश्यक आहे. सहधारकांना/ हितसंबधितांना नोटीस मिळाल्या नसतील अशा सर्व संबंधितांना या नोटीसव्दारे कळविण्यात येते की आपण वर नेमलेल्या मोजणी तारखेस सकाळी १०.३० वाजल्यापासून काम संपेपर्यंत जायमोक्यावर हजर रहावे, असे आवाहन उप अधीक्षक- भूमी अभिलेखचे उप अधीक्षक एम. के. मुंडे यांनी केले आहे.

वसंतराव नाईक हे महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते -आबासाहेब हांगे

पाटोदा - महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री मा. वसंतरावजी नाईक हे महाराष्ट्रातील हरितक्रांती व धवलक्रांतीचे खरे प्रणेते होते व त्यांनी पाणी आडवा-पाणी जिरवा, रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार योजना यासारख्या शेती विकासास पूरक अशा योजना राबवून शेतकऱ्यांचे हात बळकट करण्यासाठी पुढाकार घेतला असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १ जुलै रोजी कै. वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाच्या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यक्रमात सर्वप्रथम कै. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण प्राचार्य हांगे यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रोफेसर किशोर मचाले, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर,

उपप्राचार्य प्रोफेसर सतिष माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक प्रोफेसर गणेश पाचकोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. शरद पवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप गिऱ्हे उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. शरद पवार यांनी कै. वसंतरावजी नाईक यांच्या सामाजिक व राजकीय कार्यावर थोडक्यात भाष्य केले. सूत्रसंचालन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

तंबाखू सेवन आणि आरोग्यावर दुष्परिणाम व तंबाखु नियंत्रण कायद्याविषयी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी तंबाखू नियंत्रण २००३ नुसार प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करण्यात येतात. त्यामध्ये शाळांमध्ये विविध उपक्रम राबवून जनजागृती करणे, जिल्हा रुग्णालयात तंबाखू मुक्ती समुपदेशन केंद्रे चालवुन तंबाखू नियत्रण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित विभागांशी समन्वय साधने, विविध माध्यमांचा उपयोग करून समाजात तंबाखूच्या दुष्परिणाम विषयी जनजागृती करणे, राष्ट्रीय सनाच्या दिनी तंबाखू बाबत शपथ घेणे, अशा विविध प्रकारे तंबाखू खाण्यापासून लोकांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाबद्दल केला जातो.

जेणेकरून तंबाखूमुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम कमी करता येतात आणि कॅन्सर सारख्या महागंभीर आजारापासून बचाव करता येतो. सध्या तरुण पिढीला याचे व्यसन लागले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आरोग्याच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणात आरोग्यावर हानी होऊन शारिरीक व्याधी होऊ शकतात. त्यामुळे आरोग्य विभागामार्फत डॉ. उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बीड आणि डॉ. अशोक बडे जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय यांच्या मार्फत तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालये आणि परिसर अस्वच्छ होऊ नये तसेच लोकांना तंबाखू सेवन सोडण सोडण्याकरिता दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ती खालील प्रमाणे आहे. कलम-४ अन्वये सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन किंवा जवळ बाळगणे, कलम-६अन्वये १५ वर्षाखालील मुलाला तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करणे, कलम- ६ शासकीय व निमशासकीय संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्री केंद्र असणे, तंबाखू समुपदेशक केंद्र नोंदणी अंतर्गत नोंदणी संख्या व तंबाखू सोडलेल्यांची संख्या तंबाखूमुक्त संस्था. तंबाखू सेवणा-या व्यक्तीची दंडाची वसूल केलेली एकूण जमा रक्कम ८४,८३६ अशी आहे.

जाहीर प्रगटन

मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६९१/२०२४

राजाभाऊ व ईतर वि. निरंक विधीज्ञ एम.आर.उबाळे

ज्याअर्थी १. खोबराबाई प्र. आश्रुबा कोळपे, हया दिनांक २५.०६.२०१९ रोजी राहते घरी मयत झालेले आहे, आणि तसेच १. राजाभाऊ पि. आश्रुबा कोळपे, वय ७० वर्षे, धंदा शेती रा. बेलगांव ता. जि. बीड. २. देवाई भ्र. वसंत देवगुडे, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. बीड ता. जि. बीड. ३. तोलाबाई भ्र. बप्पा कदम, वय ५७ धंदा घरकाम, रा. कदमवाडी, ता. जि. बीड ४. रुक्मीन भ्र. बापूराव पवार, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम. रा. फुकेवाडी, पिंपरनई, लिंबागणेश ता. जि. बीड, ५. बाजीराव महादेव कोळपे, वय ३५ वर्षे, धंदा शेती रा. बेलगांव ता. जि. बीड, ६. रविंद्र पि. महादेव कोळपे, वय ३१ वर्षे, धंदा शेती रा. सदर, ७. पार्वती भ्र. महादेव कोळपे, वय ७३ वर्षे, धंदा शेती रा. सदर

अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ते ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार क्र. ५ व ६ हे मयताच्या मयत मुलाचे मुले म्हणजेच मयताचे नातु असुन अर्जदार क्र. ७ ही मयताची सुन आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे खोबराबाई भ्र. आश्रुबा कोळपे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १४/०६/२०२४ ही आहे. आज दिनांक ३० एप्रिल २०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित
क लिपीक
सह दिवाणी न्यायालय क स्तर बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जाहीर प्रगटन

मा. अविनाश म. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क . स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६३८/२०२४

अलका व इतर वि. निरंक विधीज्ञ एम.आर.उबाळे

ज्यापेक्षा अजिनाथ पि. प्रशांत दिवे, रा. आहेर धानोरा, ता.जि.बीड हे दिनांक ११/०२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १) अलका अजिनाथ दिवे पत्ता आहेर धानोरा ता.जि.बीड - २) आरती अजिनाथ दिवे आहेर धानोरा ता. जि.बीड ३) ओकांर अजिनाथ दिवे आहेर धानोरा ता.जि.बीड

अर्जदार क्र १ ही मयत अजिनाथ पि. प्रशांत दिवे यांची पत्नी असुन अर्जदार क्र २ ही मयताची मुलगी आहेत. तसेच अर्जदार क्र. ३ हा मयताचा मुलगा आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत अजिनाथ पि. प्रशांत दिवे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

पु.ता.११/०७/२०२४.

आज दिनांक १/०७/२०२४ रोजी माझाया
सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जाहीर प्रगटन

मा.श्री. आर.जी. बागडे ४ थे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५३३/२०२४

सोनाली वि. निरंक विधीज्ञ एम.आर.उबाळे

अर्जदारः १) सोनाली भ्र रविंद्र जगताप वय ३९ वर्षे धंदा घरकाम पत्ता रा.मुर्शदपुर ता. जि. बीड २) प्रविन पि. रविंद्र जगतापवय १६ वर्षे धंदा शिक्षण अज्ञान अ.पा.क आई अर्जदार क्रमांक १ रा. सदर,३)प्रिती पि. रविंद्र जगताप वय १४ वर्षे धंदा शिक्षण अज्ञान अ.पा.क आई अर्जदार क्रमांक १ रा. सदर, ४) विजुबाई भ्र शिवराम जगताप वय ५८ वर्षे धंदा घरकाम रा. सदर विरुद्ध निरंक

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रविंद्र पि. शिवराम जगताप मृत्यू झाला. यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत रविंद्र पि. शिवराम जगताप यांचा मृत्यू दि. १/०२/२०२४ रोजी झाला आहे. वरील अर्जाव्यतिरिक्त मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत रविंद्र पि. शिवराम जगताप यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रविंद्र पि. शिवराम जगताप यांचे वारस असल्याबाबतचे प्रमापापत्र देण्यान येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०५/२०२४ आहे. आज दिनांक २८/०३/२०२४ रोजी माझ्या संहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

जाहीरनामा

मा.श्रीमती एफ.बी. बेग सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४८८/२०२४

मिनाक्षी वि. निरंक विधीज्ञ एम.आर.उबाळे

मागणीः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १) मिनाक्षी ज्ञानेश्वर धुमाळे वय २७ वर्षे धंदा घरकाम पत्ता धुमाळवाडी ता. जि. बीड २) स्वारा ज्ञानेश्वर धुमाळे अ.पा.क. आई अर्जदार क्रमांक १ धुमाळवाडी ता. जि. बीड,३) संगिता रामदास धुमाळे वय ३९ वर्षे धंदा घरकाम रा. धुमाळवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला. ज्याअर्थी मयत नामे ज्ञानेश्वर रामदास धुमाळे हे राहणार धुमाळवाडी ता. जि. बीड १७/०२/२०२४ रोजी येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र १ ही मयत नामे ज्ञानेश्वर रामदास धुमाळे यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे. तसेच अर्जदार क्रमांक ३ ही मयताची आई आहे. मयत नामे ज्ञानेश्वर रामदास धुमाळे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार याना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्याजाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत ज्ञानेश्वर रामदास धुमाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमापापत्र देण्यान येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०४/२०२४ आहे. आज दिनांक २२/०३/२०२४ रोजी माझ्या संहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

स्वाक्षरित
क लिपीक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

गट शेतीची चळवळ आणखी प्रभावीपणे उभारणे काळाची गरज -सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून १ जुलै कृषीदिनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी.याचेच औचित्य साधून हरितक्रांतीचे जनक महानायक महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त साजरा १११ जयंती साजरी करतोय. मात्र सद परिस्थितीत विषमुक्त शेती होणे ही काळाची गरज असून माऊली शेतकरी गट अतिशय ताकतीने प्रयत्न आहे कौतुक करतोच त्याचबरोबर आपल्या तालुक्यासह मतदारसंघात गटशेतीची चळवळ आणखी प्रभावीपणे उभारणे काळाची गरज असल्याची माजी राज्यमंत्री सुरेशदास यांनी इच्छा व्यक्त केली वाढली पाहिजे अशी इच्छा व्यक्त केली.

ते आष्टा ह.ना. येथील जि.प. प्रा.शाळेत आयोजित कृषी दिनानिमित्त बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जि.प. सदस्य अमर निंबाळकर,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,सरपंच गणेश माळवे,मंडळ अधिकारी कोळ,गटाचे नियंत्रक सतिष

माऊली शेतकरी गटाचे कौतुक करत कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा

पठाडे,पाणी फाउंडेशन टीमचे तालुका समन्वयक प्रवीण काथवटे,गुलशन पाहुणे व सागर गोरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सहकार्याने गावांमध्ये गटशेती व नैसर्गिक किड नियंत्रणाबाबत घोषवाक्यांच्या मदतीने जनजागृती रॅली काढण्यात आली.१स्व.वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात माऊली गटाचे निमंत्रक सतीश पठाडे म्हणाले की,आमच्या माऊली शेतकरी गटात एकूण बारा सदस्य असून २०२३ मध्ये तुरीचे एकरी दहा ते अकरा क्विंटल विषमुक्त तुरीचे उत्पादन घेतले.ती तुर टुब्रदर्स या नामांकित ऑरगॅनिक कंपनीला विक्री केली.कंपनीने गटाकडे दाळ बनवण्यासाठी ठेवली होती आणि सर्व बनवलेली तूर डाळ ही त्यांनी अमेरिकेत पाठवली.आमच्या गटाचा गेल्या वर्षी पाणी फाउंडेशनची फार्मर कप स्पर्धा झाली. त्या स्पर्धेत राज्यातल्या एकूण साडेचार हजार गटापैकी जे २१ गट राज्य पातळीवर निवड झाली. राज्यपातळीवर बक्षीस न भेटता तालुका पातळीवरील क्रमांक १ चे एक लाख रुपये चे बक्षीस मिळाले.भविष्यात हा गट एक खूप मोठी कंपनी उभारण्याचे स्वप्न साकार करणार आहे.शेतकऱ्यांनी विषमुक्त शेतीकडे वळावे यावेळी बोलताना विनंती केली.यावेळी कृषी अधिकारी तरटे बोलताना म्हणाले, नैसर्गिक कीड नियंत्रण व ◀◀ पान २ वर

म्हसोबावाडी : मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने महाराष्ट्र स्वाभिमान गौरव पुरस्कार पत्रकार क्षेत्रातून अविनाश कदम यांना तर समाज सेवा क्षेत्रांतून ॲड रिजवान शेख यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार व अविनाश वाळके यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना प्रा सुहास गोपणे,माजी सरपंच अहमद शेख,सुरज चव्हाण,सुरज मुळे,सुरज माने, इंजिनिअर साहिल शेख, प्रसाद नन्नावरे आदी दिसत आहेत.

याशीनबी शेख यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथील युनूस (चेअरमन) शेख यांची आई याशिनबी शेख वय (१०२) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले, त्यांचा अंत्यविधी दुपारी २:०० वाजता सराटे वडगाव येथील कब्रस्तानमध्ये शोकाकुल वातावरणात करण्यात आला. त्यांच्या पश्चात सून, मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. सांगवी पाटण येथील सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांच्या त्या आज्जी होत्या..

श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या उपाध्यक्षपदी राजकिशोर मोदी तर सचिवपदी प्रा अशोक लोमटे

कमिटीच्या सहसचिव पदी संजय भोसले तर कोषाध्यक्ष पदी शिरीष पांडे यांची सर्वानुमते निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहराचे आराध्य, ग्राम दैवत माता श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या उपाध्यक्ष पदी अंबानगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तर सचिवपदी प्रा अशोक लोमटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नुकतीच श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या सर्व नवनियुक्त पदाधिकारी (विश्वस्त मंडळ)यांची कमिटीचे पदसिद्ध अध्यक्ष तहसीलदार विलास तरंगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये सर्व सदस्यांनी सल्लामसलत करून सर्वानुमते राजकिशोर मोदी यांची कमिटीच्या उपाध्यक्ष पदी निवड केली. त्याचबरोबर कमिटीचे सचिव म्हणून अशोक लोमटे तर सहसचिव पदी संजय भोसले तसेच कोषाध्यक्ष पदी शिरीष पांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याचे कमिटीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे यांनी जाहीर केले.निवडी जाहीर केल्यानंतर तहसीलदार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना ''मी आई श्री योगेश्वरी जगदंबेची शपथ घेतो की आम्ही श्री योगेश्वरी देवी ◀◀ पान २ वर

वसंतराव नाईक यांचे कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी - श्रीमती मुळीक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील पंचायत समिती माजलगाव व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने पंचायत समिती माजलगाव येथे दि ०१ जुलै सोमवार रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची १११ वी जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा करणायत आला यावेळी बोलताना गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांनी वसंतराव नाईक यांचे कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले.

येथील पंचायत समिती सभागृहात झालेल्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्रीमती ज्योत्सना मुळीक गटविकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव, प्रमुख अतिथी श्री शिवप्रसाद संगेकर उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव,श्री व्ही.एम.डोंगरे सहाय्यक गटविकास अधिकारी,हनुमान गरुड विषय विशेष्ज्ञ कृषी विज्ञान केंद्र खामगाव,तारा लांडे पशुधन विस्तार अधिकारी माजलगाव,श्री अण्णासाहेब जगताप शेतीनिष्ठ शेतकरी,श्री एस.जी.हजारे कृषी अधिकारी प. स. माजलगाव उपस्थित होते.यावेळी श्रीमती जोत्स्ना मुळीक यांनी शेतकऱ्यांना संबोधित करताना वसंतराव नाईक यांनी शेती क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामाची प्रेरणा घेऊन शेतकऱ्यांनी घेऊन शेती केली पाहिजे असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री शिवप्रसाद संगेकर यांनी केले कापूस, सोयाबीन पिकाविषयी शेतकऱ्यांना ◀◀ पान २ वर

पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी राज्यात दैदिप्यमान कामगिरी करेल -सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या सक्षम वारसदार, महाराष्ट्र राज्याच्या माजी ग्रामविकास,महिला व बालकल्याण विभागाच्या माजी मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत अल्पशा मताने निसटता पराभव झाला असताना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढावे यासाठी लवकरात लवकर पंकजाताई मुंडे यांचे राजकीय पुनर्वसन करून महाराष्ट्र राज्यामध्ये भारतीय जनता पार्टी मध्ये नवचैतन्य निर्माण करावे अशी मागणी भारतीय जनता पार्टी पक्ष नेतृत्वाकडे प्रत्यक्ष जाऊन आणि प्रिंट मीडिया तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाद्वारे मागणी केलेली मान्य झाली याबद्दल भारतीय जनता पार्टी पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त करतो असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले.

आष्टीत सुरेश धस मित्र मंडळाच्यावतीने जल्लोष

लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची भारतीय जनता पार्टीच्या विधानपरिषद सदस्याची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर

आष्टी येथे भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयासमोर आणि नगरपंचायत कार्यालयासमोर आमदार सुरेश धस मित्र मंडळाच्या वतीने कार्य असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहून २५१ फटाक्याची सलामी देऊन जयघोषात जल्लोष स्वागत आणि अभिनंदन केले.

धस पुढे बोलताना म्हणाले, विधानपरिषद निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय नेतृत्वाने जाहीर केलेल्या विधानपरिषद उमेदवारांच्या ◀◀ पान २ वर

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेले -डॉ.सारिकाताई क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक हे दूरदृष्टी असलेले नेते होते. त्यांनी शेतीच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेले, असे प्रतिपादन 'कल्पतरू'च्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले.

दूरदृष्टी, लोकाभिमुख राजकारणाच्या मदतीने प्रगत व पुरोगामी महाराष्ट्र घडवण्यासाठी झटणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त सोमवारी (दि.१) बीड शहरातील त्यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

पुढे बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जयंतीनिमित उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. तसेच, यानिमित्ताने साजऱ्या केल्या जाणाऱ्या कृषी दिनानिमित्त सर्व शेतकरी बांधवांनाही कृषी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागेश चव्हाण, राज्य महिला आयोगाच्या सदस्या ॲड.संगीता चव्हाण, गंगाधर घुमरे, बाबुराव जाधव, भूषण पवार, संतराम राठोड, सुशील पवार, लहू चव्हाण, विजय चव्हाण, आबासाहेब राठोड, बाबासाहेब चव्हाण, अर्जुन चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

महादेव कोळी समाज व इतर आदीवासी समाज प्रश्न वरील रद्द बैठक तात्काळ घ्या मागणी

किल्लेधारूर । प्रतिनिधी

कोळी महादेव कोळी . कोळी मल्हार कोळी ढोर / टोकरे कोळी जमातीच्या जात प्रमाण पत्र व जातवैधता प्रमाण पत्राचा प्रश्न सोडवण्यासाठी दिनांक २८/०६/२०२४ रोजीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठेवलेली बैठक काही अडचणी मुळे रद्द केली आहे. रद्द केलेली बैठक तातडीने लावण्या यावी आशी मागणी महादेव कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गोरख आबा पुर्णे यांनी केली आहे

आदिवासी कोळी जमातीचे प्रश्न सुटावे म्हणून आपण प्रामाणिक प्रयत्न करीत आहात त्या बद्दल आम्ही आपले आभारी आहोत. तथापी आपण आपल्या दालनात दिनांक २८/०६/२०२४ रोजी आदिवासी कोळी महादेव कोळी मल्हार कोळी ढोर / टोकरे कोळी जमातीच्या प्रश्नांसाठी आयोजित बैठक काही आमदारांच्या विरोधामुळे रद्द केली हे वाचून खेद वाटला. आम्ही

आदिवासी कोळी महादेव . कोळी मल्हार . कोळी ढोर / टोकरे कोळी जमाती मधील असतांना सुद्धा आम्हा विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने शैक्षणिक व नोकरीच्या संविधानिक ◀◀ पान २ वर

पत्रकारिता क्षेत्रा सोबत रेल्वे संघर्ष समिती पोरकी झाली -माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

आज सकाळी जेव्हा मला चँपावतीपत्राचे जेष्ठ संपादक नामदेवराव दादा क्षीरसागर यांच्या निधनाची बातमी कळली तेव्हा धक्का बसला नामदेवराव दादांचे आणि आम्हा क्षीरसागर परिवाराचे गेली पाच दशके अतिशय जिव्हाळ्याचे सबंध आलेले आहेत अनेक वेळा त्यांनी आम्हाला वडिलकीच्या नात्याने मार्गदर्शन केले आहे

स्व काकूंनच्या आणि माझ्या राजकीय कारकिर्दीत मार्गदर्शन करण्याचा त्यांचा मोलाचा वाटा आहे. बीड जिल्ह्यातील रेल्वे प्रश्न नामदेवराव यांनी उभा केलेल्या रेल्वे संघर्ष समितीच्या माध्यमातून गेली तीस वर्षे चालू आहे राज्यातील आणि केंद्रातील कोणतेही सरकार आसो बीड जिल्ह्याच्या रेल्वे प्रश्नी नामदेवराव यांनी त्या त्या सरकारला निवेदने देऊन आंदोलने करून जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा रेल्वे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे चँपावतीपत्रचे संपादक म्हणून त्यांनी केलेले काम पत्रकारिता क्षेत्रांत नव्याने येणाऱ्या तरुणांना प्रेरणादायी ठरणारे आहे नामदेवराव यांच्या निधनाने जिल्ह्यातील पत्रकारिता जशी पोरकी झाली आहे तशी रेल्वे संघर्ष समिती सुद्धा पोरकी झालेली आहे नामदेवराव दादा यांच्या जाण्याने पत्रकारिता क्षेत्राला आणि त्यांच्या क्षीरसागर कुटुंबियांची जी हानी झालीय ती कधीही भरून न येणारी आहे,स्व नामदेवराव यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो चंपावतीपत्र आणि नामदेवराव क्षीरसागर यांच्या कुटुंबियांना हे दुःख झेलण्याचे बळ देवो त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे असे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी शोक संदेशात म्हटले आहे

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

४० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत केले रक्तदान

माजलगाव । प्रतिनिधी

डॉक्टर्स डे,महाराष्ट्र कृषिदिन व चार्टर्ड अकौंटंट डे निमित्त दि ०१ जुलै सोमवार रोजी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने वृक्षरोपण व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरामध्ये ४० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले.

रोटरी क्लबच्या वर्षाच्या सुरवातीलाच रोटरी क्लब चे नूतन अध्यक्ष ॲड.रवींद्र कानडे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षरोपण प्रकल्प अध्यक्ष राहुल लगडे व रक्तदान शिबिराचे प्रकल्प अध्यक्ष डॉ.श्रेयस देशपांडे यांच्याद्वारे प्रथम प्रकल्प ◀◀ पान २ वर

एकेकाळी ग्रामीण भागात स्वयंपाक घरात वापरली जाणारी काठवट काळाच्या ओघात कालबाह्य

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

जसजसी मानवाची प्रगती होत गेली तसतसा माणुस नव नविन वस्तु शोधत गेला.जी आज एक दुर्मिळ वस्तु म्हणुन समजली जाते ती म्हणजे लाकडी काठवट आदिकाळात मानव दगडाच्या वस्तु वापरत होता पण दगडी वस्तु जड असल्याने मानवाने त्याच्या दैनंदिन वापरात लाकडी वस्तुचा समावेश केला,यात स्वयंपाक करण्यासाठी लागणा-या वस्तु तो सहसा लाकडापासुन बनवु लागला,धातुचा शोध लागला तरी पण काही लाकडी वस्तु माणुस अजुनही स्वयंपाकघरात वापरतो.

आज आपल्याकडे भाकरी बनवण्यासाठी परात नावाच एक भांड वापरल जात पण खेड्यांमधे १९८०-९० च्या दशकापर्यंत भाकरी बनवण्यासाठी लाकडी वस्तु वापरली जायची जीला काठवट अस म्हणल जायच, थोडीशी लंबगोल, खोलगट आणि दोन बाजुला कान असलेल हे लाकडी भांड लाकडाच्या एका

गोलाकारओंडक्याला कोरुन परातीच्या आकाराच हे भांड बनवल जायच, काही भांड्याच्या दर्शनी भागावर नक्षीकाम केल जायच तर काही काठवटींचे उच्च कान आकर्षक असायचे पण काळाच्या ओघात हे भांड आज दुर्मिळ झालय,सहसा खेड्यामध्ये काही लोकांकडे आहे पण तेहि तुटलेल्या अवस्थेत, अडगळीच्या खोलीतच काठवटीसारख्या अनेक वस्तु आज काळाच्या ओघात नष्ट होत असल्या तरी पण काही माणसं अजुनही पुरातन वस्तु अगदि आपुलकीन जपुन ठेवताना दिसतात.

मी जेव्हा लहान होतो तेव्हा आमची आजी लाकडी काठवटीत बाजरीच मीठ मळुन त्यातच भाक-या थापायची, तीला परातीत भाकरी कधी जमलीच नाहि पण नंतरच्या काळात तीच्या काथवडीला मधोमध छीद्र पडल्यान तीने ती वापरणही सोडल आणि स्वयंपाक घर सुध्दा.

- रामेश्वर सावंत, घळाटवाडी

आजीच्या सासुच्या म्हणजे माझ्या पणजीच्या काळापासुन असलेली ती काठवट आज लोकांना फक्त एक पुरातन लाकडाच भांड असल तरीआमच्यासाठी सुमारे तीन पिढ्यांच्या भाकरी त्या काठवटीत बनल्या होत्या म्हणुन आम्ही ती अजुनही जपुन ठेवली आहे

-आनुरथ सुरवसे, घळाटवाडी

नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने जिल्हयाने ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकार गमावला-पंकजाताई मुंडे

बीड । प्रतिनिधी

दैनिक चंपावतीपत्रचे संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने जिल्ह्याने एक ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकार गमावला आहे, अशा शब्दांत भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी शोकभावना व्यक्त करत क्षीरसागर यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

ज्येष्ठ संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या दुःखद निधनाने पत्रकारितेचे मोठे नुकसान झाले आहे. क्षीरसागर यांनी दैनिकाच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाला न्याय देण्याचे काम तर केलेच याशिवाय बीडला रेल्वे आणण्यातही त्यांचे योगदान महत्वाचे होते. संस्कार प्रबोधिनीच्या माध्यमातून शैक्षणिक चळवळ देखील त्यांनी उभी केली.बीड जिल्हा व मराठवाड्यातील जनसामान्यांच्या प्रश्नांना त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून वाचा फोडून न्याय मिळवून दिला. केवळ पत्रकारिताच नव्हे तर विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम त्यांनी केले. एक मनमिळावू आणि व्यासंगी संपादक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या निधनाने जिल्हा एका ज्येष्ठ व अभ्यासू संपादकाला मुकला असून पत्रकारितेची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशा शब्दांत पंकजाताई मुंडे यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

भुशी डॅमच्या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय; लोणावळ्यात संध्याकाळी ६ नंतर पर्यटकांसाठी 'संचारबंदी'

पुणे । प्रतिनिधी

लोणावळ्यातील धबधब्यात अन्सारी आणि सय्यद कुटुंबीय वाहून गेल्यानं पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याचअनुषंगाने थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी कठोर कारवाईचे आदेश दिलेत. संध्याकाळी सहानंतर पर्यटकांना पर्यटनस्थळी फिरण्यास मज्जाव करण्यात आलंय. याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पर्यटकांना आणि कारवाईत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ही बडगा उगारला जाणार आहे, असं पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसेंनी जाहीर केलंय. पुढच्या काही तासांत लोणावळ्यातील पर्यटनासाठी विशेष नियमावली जाहीर केली जाणार असल्याचं ही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं.

लोणावळ्यात हुल्लडबाजी करणऱ्या तरुणांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात येणार आहे. इतर पर्यटांना त्रास होईल असे वर्तन, हुल्लडबाजी आम्ही सहन करणार नाही. त्यांच्यावर कारवाई निश्चित होणार आहे. सार्वजनिक सुट्ट्या आणि विकेंडला अनेक तरुण- तरूण येतात. रात्री गोंधळ घालणे, हुल्लडबाजी करणे अशा अनेक तक्रारी आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर संध्याकाळी सहानंतर पर्यटकांना पर्यटनस्थळी फिरण्यास मज्जाव करण्यात आला आहे. जर संबंधित अधिकाऱ्याने कारवाई करण्यात दिरंगाई केली तर आम्ही थेट अधिकाऱ्यावरच कारवाई करणार आहे. तसे आम्हाला मुख्यमंत्र्यांचे आदेश आले आहेत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

लोणावळ्यातील पर्यटनासाठी विशेष नियमावली जाहीर करणार आहे. लोणावळा, खंडाळा परिसरातील निसर्गसौंदर्य हे पावसळ्यात पर्यटकांना भुरळ पडत आहे. त्यामुळे विकेंडच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत आहे. पुणे-मुंबईसह लगतच्या भागातून नागरिक या ठिकाणच्या विविध पॉईंटवर गर्दी करत आहेत. मात्र, पर्यटकांनी जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी नेमून दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, अन्यथा पोलिसांनी कारवाईचा इशारा दिला आहे. अपघात, पाण्यामध्ये तरुणाचा अतिउत्साह आणि व्हीडीओ आणि रिलीज या नादात घातपात होण्याची शक्यता लक्षात घेता सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आली आहे.

लोणावळा, मुळशी, मावळ तसेच पवना परिसरातील नदी, धबधबे या ठिकाणी पाण्यात उतरून तरुणांनी अतिउत्साहीपणा करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. रविवारी भुशी धरणात पुण्यातील पाच जणांचा मृत्यू झाला. ताम्हिणीत देखील एकाचा अतिउत्साहाच्या नादात एकाचा मृत्यू झाला आहे. लोणावळा, मावळ या ठिकाणी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. या ठिकाणच्या धरणामध्ये खोलीचा अंदाज न आल्याने अपघात होत आहेत. त्यामुळे येथील निसर्गाचा आनंद घेताना इतरांच्या जिवाला धोका होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रशासनाने नेमून दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

पुणे पोर्शे अपघात प्रकरणी पुणे पोलिस सुप्रीम कोर्टात जाणार

पुणे : पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला जामीनावर सोडण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात पुणे पोलीस सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहेत. याबाबतची माहिती पुणे शहर पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. याबाबत एएनआय वृत्तसंस्थेने पोस्ट केली आहे.

पुणे येथील पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला २५ जून रोजी मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी राज्याच्या गृह विभागाने शनिवारी पुणे पोलिसांना परवानगी दिली आहे.

मद्यधुंद अवस्थेत अल्पवयीन मुलाने भरधाव पोर्शे कारने १९ मे रोजी पुण्यातील

दोन आयटी इंजिनिअरला चिरडले होते. संशयित आरोपीच्या सुटकेसाठी त्याच्या नातेवाईकांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. दोन्ही बाजूंच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने २५ जून रोजी अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर केला होता. पुण्यातील कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीने तो मद्यपान करत असल्याची कबुली दिली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मुलगा दारु पित असल्याचे त्याच्या वडिलांना माहित होते. तरीही त्यांनी त्याला अलिशान पोर्शे कार चालविण्यास दिली असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. पोर्शे कार अपघातातील आरोपीचे वडील, 'ब्रह्मा ग्रुप'चे विशाल अग्रवाल यांच्यासह हॉटेल मालक प्रल्हाद भुतडा, व्यवस्थापक सचिन काटकर, हॉटेलचे मालक संदीप सांगळे, बार व्यवस्थापक जयेश बोनकर अशा चार जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. विशाल अग्रवाल याला २१ मे रोजी अटकही करण्यात आली होती.

पुणे मेट्रो सुसाट! एकाच दिवसात प्रवासी संख्येत दुपटीने वाढ

पुणे । प्रतिनिधी

पुणे मेट्रोची विस्तारित मार्गांवरील सेवा सुरू झाली आहे. वनाझ ते रुबी हॉल आणि पिंपरी ते जिल्हा न्यायालय या विस्तारित मार्गांवरील प्रवासी संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. पुणे मेट्रोने ३० जून रोजी १,९९,४३७ प्रवाशांची विक्रमी संख्या गाठून तब्बल २४,१५,६९३ ची एकूण कमाई केली, जी आतापर्यंतची सर्वाधिक प्रवासी संख्या आहे.१,९९,४३७ प्रवाशांपैकी ८३, ४२६ प्रवाशांनी लाईन एकवरून (पीसीएमसी ते जिल्हा न्यायालय) तर १,१६,०११, प्रवाशांनी लाईन दोनवरून मेट्रोने प्रवास केला आहे.

पीसीएमसी मेट्रो स्थानकात सर्वाधिक १९,९१९ प्रवाशांची नोंद झाली, त्यापाठोपाठ पीएमसी (१८,०७९), शिवाजीनगर (१७,०४६), पुणे रेल्वे स्थानक (१५,३७८) आणि रामवाडी (१४७७०) येथे प्रवाशांची सर्वाधिक नोंद झाली. याव्यतिरिक्त, जिल्हा न्यायालय स्थानकावरून सुमारे ५१,०२६ प्रवाशांनी त्यांची मार्गिका बदलली . यापूर्वी, १५ ऑगस्ट रोजी १,६८,०१२ प्रवाशांसह आणि ६ ऑगस्ट २०२३ रोजी लाइन १ आणि लाइन २ या दोन्ही मार्गावर तब्बल १, ३१, ०२७ प्रवाशांसह सर्वाधिक प्रवासी नोंदवले गेले होते. विशेष म्हणजे, लाईन एकने १६ जून २०२४ रोजी ३६, ९३२ प्रवाशांची सर्वाधिक संख्या गाठली, तर लाईन दोनने २५ जून २०२४ रोजी ६४,३७८ प्रवाशांसह शिखर गाठले. १५ ऑगस्ट १,६८, ०१२ प्रवाशांसह आणि ६ ऑगस्ट २०२३ रोजी लाइन १ आणि लाइन २ या दोन्ही मार्गावर तब्बल १,३१,०२७ प्रवाशांसह सर्वाधिक प्रवासी नोंदवले गेले होते. विशेष

म्हणजे, लाईन एकने १६ जून २०२४ रोजी ३६,९३२ प्रवाशांची सर्वाधिक संख्या गाठली, तर लाईन दोनने २५ जून २०२४ रोजी ६४,३७८ प्रवाशांसह शिखर गाठले. ही आकडेवारी पुणे मेट्रोच्या वापरातील सातत्याने होत असलेली वाढ आणि पुणे मेट्रोने पुरवलेल्या सेवेच्या विश्वासार्हतेवरील जनतेचा विश्वास प्रतिबिंबित करत आहे. पुणे मेट्रोच्या एक पुणे महाकार्ड आणि एक पुणे विद्यार्थी महाकार्डमध्येही अनुक्रमे ३९, ०२५ आणि १०,५२२ कार्डांची विक्री झाली आहे. काल, पीसीएमसी मेट्रो स्टेशन, पीएमसी, शिवाजीनगर, पुणे रेल्वे स्टेशन, रामवाडी, जिल्हा न्यायालय, वनाझ, डेक्कन जिमखाना, नश स्टॉप आणि भोसरी ही प्रवासी संख्येच्या बाबतीत विक्रमी १० स्थानके होती.

नारायणगाव येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडवा

नारायणगाव । प्रतिनिधी

पुणे-नाशिक महामार्गावरील बसस्थानक चौक, नारायणगाव-जुन्नर, कोल्हे मळा, खोडद रस्ता या भागांत वाहतूक कोंडीची समस्या नित्याचीच झाली आहे. वाहतूक समस्येतून शालेय विद्यार्थी, शेतकरी, प्रवासी व नागरिकांची सुटका करण्यासाठी नारायणगाव पोलिस स्टेशनला अतिरिक्त वाहतूक पोलिस कर्मचारी द्यावे, अशी मागणी आमदार अतुल बेनके यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांच्याकडे केली आहे.

जुन्नर तालुक्यातील नारायणगाव ही प्रमुख बाजारपेठ आहे. नारायणगाव हे गाव पुणे-नाशिक रस्त्यावर येत असल्याने गावातून पुणे व नाशिक या शहरात मोठ्या प्रमाणावर बसेस, चारचाकी वाहनांची ये-जा असते. नारायणगाव-वारूळवाडी या ठिकाणी जुन्नर कृषी उत्पन्न

बाजार समितीचे उपबाजार केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, शाळा, महाविद्यालय, एसटी बस स्थानक असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा असते.

नारायणगाव व वारूळवाडी परिसरात नागरिकरण वाढत असून लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे सद्यःस्थितीत असलेले अरुंद रस्ते, रस्त्याच्याकडेला असलेल्या अतिक्रमणामुळे रस्ते वाहतुकीस अपुरे पडत आहेत. नारायणगाव हे तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने एसटी बस स्थानक परिसरात वाहतूक कोंडीची समस्या नित्याचीच झाली आहे.

नारायणगाव पोलिस ठाण्याच्या वतीने वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, पोलिस ठाण्याला कर्मचारी कमी पडतात. कर्मचारी पुरेशा प्रमाणात नसल्याने त्याचा परिणाम वाहतूक सुरळीत करण्यावर होतो. अतिरिक्त पोलिस कर्मचारी दिल्यास वाहतूक कोंडीची समस्या कमी करण्यास मदत होईल. वाहतूक कोंडीची समस्या कमी करण्यासाठी नारायणगाव पोलिस ठाण्याला वाढीव वाहतूक पोलिस कर्मचारी द्यावेत, अशी मागणी आमदार अतुल बेनके यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पाठीमागून मोटारीची धडक; कारागृह अधिकारी जखमी

पुणे । प्रतिनिधी

मोटारीच्या धडकेत कारागृहातील वरिष्ठ अधिकारी जखमी झाल्याची घटना विमाननगर भागात घडली. याप्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबण्णा खंडाप्पा हरवाळकर (वय ३२, रा. लोहगाव) असे मोटारचालकाचे नाव आहे. आनंदा शंकरराव कांदे (वय ५५, रा. येरवडा) हे अपघातात जखमी झाले आहेत. कांदे हे येरवडा मध्यवर्ती कारागृहात वरिष्ठ अधिकारी आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कांदे सोमवारी (ता. १) सकाळी दुचाकीवरून भाजी आणण्यासाठी निघाले होते. विमाननगर परिसरातील टाटा गार्डरूम चौकात दुचाकीस्वार कांदे सिग्नलला थांबले होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या मोटारीने दुचाकीस्वार कांदे यांना धडक दिली. त्यामुळे कांदे रस्त्यावर पडले. अपघातात कांदे यांचे डोके आणि हाताला जखम झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच विमानतळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक आनंदराव खोबरे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

पुण्यात झिकाचा धोका वाढला, एरंडवणेतील गर्भवती महिलेला झिकाचा संसर्ग

पुणे : पुण्यात झिका व्हायरसचा प्रादुर्भाव दिवसेंदिस वाढत आहे.पुण्यातील एरंडवणे परिसरातील एका गर्भवती महिलेला झिकाचा संसर्ग झाला आहे. त्यामुळे पुणे शहरातील झिकाची एकूण रुग्णसंख्या पाचवर गेली आहे. गर्भवती महिलेला संसर्ग झाल्याने तिच्या बाळामध्ये विकृती निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच, पालखीच्या पार्श्वभूमीवर शहरात झिका संसर्ग वाढण्याचा धोकाही निर्माण झाला आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत एरंडवणेत २१ जून रोजी दोन झिकाचे रुग्ण सापडले. यामध्ये ४६ वर्षांचा डॉक्टर आणि त्याच्या १५ वर्षाच्या मुलीला झिकाचे निदान झाले. त्यानंतर मुंढवा येथे ४७ वर्षांची एक महिला आणि तिच्या २२ वर्षांच्या मुलालाही झिकाचे निदान झाले. आता एरंडवणेतील गणेशनगर येथील २८ वर्षीय गर्भवतीला लागण झाली आहे. झिका जीवघेणा आजार नाही. ताप, डोकेदुखी, अंगावर पुरळ, सांधेदुखी अशी लक्षणे दिसून येतात आणि उपचारांनी ती जातात, परंतु त्याचा खरा धोका गर्भवती महिलांच्या बाळांना जास्त आहे.

झिका विषाणूचा गर्भावर काय परिणाम होतो?

आरोग्य तज्ज्ञांच्या माहितीनुसार, झिका व्हायरस टाळण्यासाठी गरोदर स्त्रियांनी काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण याचा सर्वाधिक धोका गर्भावर होतो. त्यामुळे गरोदरपणात जर झिका विषाणूचा संसर्ग झाल्यास, बाळाचा मेंदू सामान्यपणे वाढू शकत नाही आणि विकसित होऊ शकत नाही. परिणामी, बाळाचा जन्म मेंदूच्या विकासाशी संबंधित अपंगत्व घेऊन होऊ शकतो, किंवा त्याचे डोके लहान असू शकते, तसेच बाळामध्ये ऐकणे, शिकणे आणि वागण्यात देखील समस्या असू शकतात. पहिल्या तिमाहीत झिका संसर्ग झाल्यानंतर या समस्यांचा धोका सर्वाधिक असतो. झिका विषाणूचा गर्भधारणेचे प्रमाण घटण्याशी देखील संबंध आहे, असे डॉ. कल्पना बळीवंत म्हणल्या.

रक्ताचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे पाठवण्यात आले

गर्भवती महिलेची प्रकृती स्थिर आहे. रुग्णांच्या संपर्कात आलेले आणि तापाची लक्षणे असलेले त्यांचे कुटुंबीय आणि इतर व्यक्तींचे रक्ताचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेकडे पाठवण्यात आला आहे. झिकाचे रुग्ण आढळून आलेल्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु आहेत . पुण्यातील एरंडवणे आणि मुंढव्यात रुग्ण आढळलेल्या परिसरात प्रत्येकी १०० घरांच्या आतमध्ये धूर फवारणी करण्यात आली आहे.

बैल खरेदी गोळीबार प्रकरण : गौतम काकडेला पोलिसांकडून अटक

बारामती : निंबूत येथे बैल खरेदी व्यवहाराच्या वादातून गोळीबाराची घटना घडली होती. या घटनेत रणजीत निंबाळकर यांचा शनिवारी पहाटे उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर बारामती, फलटणसह बैलगाडा शर्यत क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी रणजित निंबाळकर यांची पत्नी अंकिता निंबाळकर यांनी वडगाव निंबाळकर पोलिसात फिर्याद दिली होती. याप्रकरणी संशयित आरोपी गौतम काकडे यांना पोलिसांनी अटक केली आहे. सुंदर नावाच्या बैलाच्या व्यवहारातून निंबाळकर आणि काकडे यांच्यात वाद झाला होता. यातून रणजित निंबाळकर यांच्यावर गुरुवारी गोळीबार झाला होता. घटनेनंतर गौतम काकडे फरार झाले होते. शनिवारी रणजीत निंबाळकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर रविवारी रात्री गौतम काकडे यांना पोलिसांनी अटक केली. गौतम काकडे यांना अटक करा, यासाठी रणजित निंबाळकर यांच्या पत्नीने आत्मदहनाचा इशारा दिला होता. गौरव काकडे आणि शाहजी काकडे यांना आधीच पोलिसांनी अटक केली आहे.

विठुरायाच्या भेटीसाठी निघालेला वारकऱ्यांचा टेम्पो कात्रज-कोंढवा रस्त्यावर पलटी, पाच वारकरी जखमी तर २० जणांना दुखापत

पुणे । प्रतिनिधी

विठुरायाच्या दर्शनाला पंढरपूरला () जाणाऱ्या वारकऱ्यांच्या टेम्पोला पुण्यात किरकोळ अपघात झाला आहे. वारकऱ्यांचा टेम्पो उलटून पाच वारकरी जखमी तर २० जणांना दुखापत झाली आहे. पुण्यातील कात्रज कोंढवा रस्त्यावर ही घटना घडली आहे. सुदैवाने कोणतीही जीवीतहानी झाली नाही. याप्रकरणी टेम्पोचालकाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. जखमी वारकऱ्यांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत. जखमींमध्ये बहुतांश महिला वारकरी दिसून येत आहेत.

हातात भगव्या पताका, डोक्यावरी तुळस, टाळ - मृदंगाचा गजर आणि माऊली - तुकोबांचा जयघोष अशा भक्तिमय वातावरणात माऊलींची आणि संत तुकाराम महाराजांची पालखी पुण्यात दाखल झाली आहे. लाखो वारकऱ्यांचा मेळा पंढरीच्या दिशेने निघाला आहे. दोन्ही पालखीचे पुण्यात जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरम्यान वारकऱ्यांना घेऊन

निघालेला टेम्पो उलटल्याची घटना कात्रज -कोंढवा रस्त्यावरील शिवशंभोनगर परिसरात रविवारी रात्री घडली आहे. हा टेम्पो परभणी वरून पंढरपूरकडे निघाला होता. यातले वीस वारकरी हे मुक्कामाच्या ठिकाणी जात असताना घडली आहे. कात्रज कोंढवा रस्त्यावर चालकाचा टेम्पोवरील ताबा सुटल्याने अपघात झाला. पाचही वारकऱ्यांना उपचार देऊन सोडण्यात आलं आहे.

नेमका कसा झाला अपघात?

प्रयागबाई नारायण बोखारे (वय ७२, रा. फुकटगाव, जि. परभणी) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, टेम्पोचालक नवनाथ लक्ष्मणराव चोपडे (रा. धार, जि. परभणी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कात्रज कोंढवा रस्त्यावरील शिवशंभोनगर परिसरात गल्ली क्रमांक एक येथे टेम्पोचालक चोपडे याचे नियंत्रण सुटले. टेम्पो उलटून टेम्पोतील वारकऱ्यांना दुखापत झाली.

आज दोन्ही पालख्या पुण्यात

आषाढी वारीसाठी वारकऱ्यांमध्ये मोठा उत्साह होता. हातात भगव्या पताका आणि मुखात विठू माऊलीचा जप करत त्यांची दिंडी पुण्यात पोहोचली आहे. संत तुकाराम महाराजांची पालखी नाना पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिरात तर माऊलींची पालखी भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात मुक्कामी आहे. पुणेकरांना संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी तसेच वारकऱ्यांच्या सेवेसाठी आजचा पूर्ण दिवस मिळणार आहे.